
# छात्र प्रबोधन

सौर वैशाख, शके १९४३ । वर्ष २१ अंक ८।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष २९ अंक १०)
वार्षिक वर्गणी ₹ २००। मूल्य ₹ २०। पृष्ठे ३६

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!



विविध प्रकल्पांच्या माध्यमातून विविध तंत्रज्ञानाच्या साह्याने
प्रत्येक मुलापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोचवण्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी, पुणे संचलित

# शैक्षणिक साधन केंद्र






**MOOL (Movement of Open Online Learning)**
**मुक्त शिक्षणाची चळवळ**

## मान्यवर सहयोगी संस्था

Ministry of Education
Government of India
सत्यमेव जयते

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

eTechSchool

**CSR**

MAERSK

Prescient Technologies

Emtec

SEAGATE

**Services**

TCS iON

Tech Mahindra FOUNDATION

## दिक्षा

शिक्षण मंत्रालयाशी संलग्न.
अध्ययन– अध्यापनासाठी उत्तम शैक्षणिक संदर्भ मिळवण्यासाठी राष्ट्रीय संगणकीय पटल.
दिक्षा ॲपसाठी १००० पेक्षा जास्त व्हिडिओ निर्मिती विज्ञान, गणित, भूगोल, संस्कृत याविषयांव्यतिरिक्त आता मराठी या विषयावरही काम सुरू.

## व्हिडिओ निर्मिती प्रशिक्षण

जम्मू काश्मीर, बिहार, लडाखच्या शिक्षण खात्यातर्फे तेथील शिक्षकांसाठी दिक्षा साधन निर्मिती प्रशिक्षण

## ज्ञानवर्धन पेटी प्रशिक्षण

महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यातील २५ कर्ण बधिर मुलांच्या शाळांच्या १२५ शिक्षकांसाठी दिक्षा ज्ञानवर्धन पेटी प्रशिक्षण



## करून तर बघा !

YouTube

**ERCJPP** या YouTube चॅनेलवरील व्हिडिओच्या शेवटी कृती आव्हान दिलेले आहे. ते करून बघा आणि ८९५६०११५४५ या क्रमांकावर पाठवा.

## इ-अंक पाहाण्यासाठी... विशेष रचना

(हव्या त्या लेखावर थेट जाण्यासाठी आधी खालील सूचना वाचा व त्यानुसार कृती करा.)

* (स्क्रोल केल्यानंतर) ‘अंतरंगा’चे पान येईल त्यानंतर ‘संवादा’चे पान दिसेल.
* अंतरंगात अंकातील सर्व साहित्याची यादी पाहायला मिळेल. त्यापैकी जो लेख तुम्ही वाचू इच्छिता त्या ‘शीर्षका’ला क्लिक केल्यावर तुम्ही थेट त्या लेखावर जाऊन तो लेख वाचू शकाल.
* लेखाच्या शेवटी पान क्रमांकावर क्लिक केल्यास परत तुम्ही अंतरंगावर येऊ शकाल व पुन्हा तुम्हाला हव्या त्या लेखाच्या शीर्षकावर क्लिक करता येईल.
* ज्या लेखांना क्यू आर कोड दिले आहेत तेथे क्यू आर कोडवर क्लिक केल्यावर थेट तो दुवा उघडेल व ते साहित्य ऐकता/वाचता/पाहाता येईल.

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन

**सौर वैशाख, शके १९४३। वर्ष २१ अंक ८**
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३४६ वा अंक, वर्ष २९ अंक १०)
प्रकाशन दिनांक – सौर ११ वैशाख, शके १९४३/१ मे २०२१

## अंतरंग

४. **संवाद*** – शिल्पा कुलकर्णी
५. ललित... **कोल्हापूरातील अविस्मरणीय सुट्ट्या!*** – जयंत नारळीकर
१०. कविता... **मीही लुटेन अक्षर-खजिना...*** – डॉ. सुमन नवलकर
११. पुस्तक परिचय... **कैफियत** – दीपा पळशीकर
१३. कथा ... **हक्काची पोळी** – डॉ. प्रदीप आवटे
१६. मुलांचं पान... **चित्रावरून म्हणी ओळखा** – चि. कृष्णा बोर्डे
२१. पाककृती... **पालक-मूग डोसे, मुटकुळे** – कु. मुक्ता कुलकर्णी
२२. कलाकृती... **शाडू मातीचा पेनस्टँड*** – संजय बुगटे
२३. कथा... **'सरस्वती' तू कुठे आहेस?*** – नीलिमा करमरकर
२९. ललित... **अंधारात पडलेला प्रकाश** – कु.विशाखा मठे
३०. माहितीपर ... **नवचैतन्याची नवी पालवी!*** – डॉ. कांचनगंगा गंधे
३३. शब्दांच्या उगमकथा... **ताकास तूर लागू न देणे** – नेहा लिमये
मलपृष्ठाच्या आतील पद्य... **मनामनातून आज गर्जू दे....*** – वाच. अनघा लवळेकर

**अंकासोबत आकर्षक भेट : धम्माल कृती-पुस्तिका* (पान क्र. १७ ते २०)**
**परिसर न्याहाळताना...** – शिवराज पिंपुडे

**याशिवाय :** किस्से शास्त्रज्ञांचे (९), शब्द एक... (१२), बालकुमार मासिकांमधील साहित्याची झलक* (२८), 'क' चे कडबोळे (३३), हसा हसा..., प्रतिसादी वाचकवीर व्हा.(३४)

**पानाखालील ओळी : काव्यपंक्ती** - व्यक्तिमत्त्व विकसनपर. **माहितीपर** - जरूर पाहावे असे चित्रपट.

**मुखपृष्ठाविषयी :** 'सागराने तया वेढूनी, उभा तटस्थ हा पाय रोवोनी।
ओहोटी वेळी दर्शन होई, जलदुर्ग हा दणकट भारी।'
ओहोटीच्या वेळी या कुलाबा जलदुर्गाचे दर्शन घेतल्यानंतर माझ्या मनास या दुर्गाचे राकट, दणकट रूप खूपच भावले. स्वच्छ सूर्यप्रकाशात तर ते अजून खुलून दिसत होते.
**– भास्कर सगर**

अवश्य वाचा... पाहा... ऐका...
*** या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.**
त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करून घ्या.

इ–मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
ज्ञान प्रबोधिनीच्या पुस्तकांच्याऑनलाइन खरेदीसाठी jpprakashane.org या संकेतस्थळाला भेट द्या!!

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया
**मानद संपादक :** शैलजा देशमुख
**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे
नीलिमा करमरकर, आश्लेषा महाजन
**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी
**साहाय्यक कार्यकारी संपादक**
अनादि ढवळे
**मुखपृष्ठ :** भास्कर सगर
**आतील चित्रे :** देवेंद्र कोतवाल, राहुल धामणे, निलेश जाधव

**संपर्क पत्ता**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५
संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org

**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
**वार्षिक :** ₹ २०० **द्वैवार्षिक :** ₹ ४००
**त्रैवार्षिक :** ₹ ५५० **दशवार्षिक :** ₹ १७००
**इ-अंक वार्षिक वर्गणी :** ₹ १००
**या अंकाची किंमत : ₹ २०/–**
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा
चेक/डी.डी. '**ज्ञान प्रबोधिनी**' अथवा **'Jnana Prabodhini'** याच नावाने काढावा.

NEFT साठी बँकेचे तपशील पुढीलप्रमाणे –
**Account Name** - Jnana Prabodhini
**Bank Name** - Bank Of India
**Account No.**- 051510110004917
**Branch** - Shanipar, Pune
**IFSC Code** - BKID0000515
ऑनलाइन वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!

वार्षिक देणगीदार – • श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे • एक हितचिंतक, पुणे • श्री. उदय परांजपे, पुणे

संवाद

**प्रिय प्रबोधकांनो,**

कसे आहात सगळे? घरात सुरक्षित आहात ना! कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे बाहेरची परिस्थिती खूपच बिकट झाली आहे. सगळीकडे अनिश्चिततेचा, निरुत्साही वातावरणाचा अनुभव सर्वांना येतो आहे. खरंतर, उन्हाळी सुट्टी म्हणजे मौज-मजेचा, आनंदाचा काळ! पण अशा परिस्थितीत सुट्टीचा काळ आनंददायी, चैतन्यपूर्ण करण्यासाठी नेमकं करायचं काय? याचा संभ्रम तुमच्यापैकी अनेकांना पडला असेल. एकसारख्या त्याच त्या बातम्या, टीव्हीचे कार्यक्रम पाहून, *कॉम्प्युटर गेम* खेळून कंटाळा आलाय... 'नक्को तो *स्क्रीन*,' असं देखील वाटतं कधी कधी... त्यामुळे मनाला एक प्रकारची मरगळ येते आणि हवीहवीशी सुट्टी जणू अंगावर येते, हो ना! कोरोनासारख्या आपत्तीत तर त्याची तीव्रता अधिक गडद होते.

मनाच्या या मरगळलेल्या, म्लान अवस्थेतून तुम्हाला कोण बाहेर काढणार? तर त्याचं उत्तर एकच आहे, 'तुम्ही स्वत:, हो हो तुम्ही स्वत:च!' आणि त्यासाठी कुठेही बाहेर जाण्याची गरज नाही बरं का! स्वस्थ चित्तानं, डोळे मिटून तुमच्या मनात जरा डोकाऊन पाहा बरं! तुम्हाला काय आवडतं, काय नाही आवडत? वेळेअभावी कोणते छंद तुम्ही गुंडाळून ठेवलेत? पूर्वी कधीतरी सुट्टीत करायचे मनसुबे मनात आखून ठेवले असतील, तर त्याच्यावर बसलेली धूळ पण जरा झटकून पाहा बरं! कोणती गोष्ट करण्यात तुम्ही रमता, कोणते अनुभव घ्यायला तुम्हाला मनापासून आवडतात, कोणत्या गोष्टी 'करून पाहू' म्हणून तुम्ही केलेल्या आहेत याविषयी थोडी-थोडी स्पष्टता यायला लागेल. आणि हे असं एकदाच मनात डोकावून पुरणार नाही बरं का! रोज, ठरवून, नियमितपणे, स्वस्थ चित्तानं मनात डोकावायला लागेल. म्हणजे तुम्हाला तुमच्या आवडी-नावडीबाबतचं चित्र हळूहळू स्पष्ट व्हायला मदत होईल. या तुमच्या कसोटीच्या काळात 'छात्र प्रबोधन' एक वाटाड्या, मार्गदर्शक म्हणून सतत तुमच्याबरोबर असेल, याची खात्री बाळगा. तुम्हाला काय वाचायला आवडेल, कुठले नवीन अनुभव घेण्याच्या संधी तुम्हाला देता येतील, असा विचार छात्र प्रबोधनमध्ये नित्य सुरू असतो.

अरे हो, मागच्यावेळी तुम्हाला एक सांगायचं राहूनच गेलं. दीड-दोन महिन्यापूर्वी बालकुमार मासिकं प्रकाशित करणाऱ्या संपादकांचं *ऑनलाइन* चर्चासत्र छात्र प्रबोधतर्फे आयोजित केलं होतं. त्याला ७-८ संपादक उपस्थित होते. त्यामध्ये खास बालकुमारांसाठी प्रकाशित होत असलेल्या मासिकातील साहित्याची झलक आपापल्या मासिकातून QR code द्वारे दाखवण्याचा उपक्रम सुरू करण्याचं ठरलं. हा उपक्रम सुरू करण्यासाठी छात्र प्रबोधनने आनंदाने पुढाकार घेतला आणि सौर चैत्र (एप्रिल)च्या अंकापासून उपक्रम सुरूदेखील झाला.

छात्र प्रबोधनच्या या अंकात **'परिसर न्याहाळताना' ही कृती-पुस्तिका** दिली आहे. फार भन्नाट कल्पना यामध्ये सुचवल्या आहेत. ते करताना मजा येईल आणि तुम्ही आपल्या परिसराकडे अधिक डोळसपणे पाहायला लागाल. या सुट्टीचा फायदा घेऊन सुचवलेल्या वेगवेगळ्या कृती/उपक्रम जरूर करून पाहा. त्याबाबत तुमचे अनुभव लिहून, शक्य असेल तिथे *फोटो* काढून भावंडांना, मित्रमैत्रिणींना *शेअर* करा.


याशिवाय छात्र प्रबोधनचा **'ऐपावाक'(ऐका-पाहा-वाचा-करा) या १ मे ते २० जून २०२१, या कालावधीसाठी नव्याने सुरू झालेल्या ऑनलाइन, कृतिप्रधान उपक्रमात (मोफत)** सहभागी व्हा! सहभागी होण्यासाठी सोबतचा QR code स्कॅन करा. वेगवेगळे अनुभव घ्यायच्या अनेक संधी त्याद्वारे तुम्हाला मिळतील व तुमची सुट्टी समृद्ध करतील. त्यामुळे तुमच्या मनाला आलेली मरगळ केव्हाच पळून जाईल आणि काहीतरी वेगळं करून बघितल्याचा, काहीतरी 'मिळवल्या'चा आनंद तुमच्या मनात काठोकाठ भरून राहील!

**तुम्हा सर्वांना ही सुट्टी स्वाथ्यपूर्ण, आनंददायी, मनासारखी जावो यासाठी अनेक शुभेच्छा!**
**घरी राहा, सुरक्षित राहा!**

तुमची,
**शिल्पाताई**

जरूर पाहा : एलिझाबेथ एकादशी (२०१४) - मराठी - आवडती सायकल वाचवण्यासाठी केलेल्या खटाटोपाची गोष्ट.

वार्षिक देणगीदार - • श्री. अमित बागाईतकर, पुणे • श्री. संजय प्रधान, सातारा • श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु - कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ.



# कोल्हापूरातील अविस्मरणीय उन्हाळी सुट्ट्या!

– जयंत नारळीकर

माझ्या आयुष्यातील पहिली १९ वर्षे 'बनारस हिंदू युनिव्हर्सिटी'च्या रम्य आवारात गेली. उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली की, मात्र आम्हाला कोल्हापूरला जाण्याचे वेध लागायचे; कारण आईचं माहेर आणि वडिलांचं मूळ घर दोन्ही कोल्हापूरलाच! त्यामुळेच उन्हाळ्याची सुट्टी कोल्हापूरला घालवायची तीव्र इच्छा सगळ्यांच्याच मनात असायची!

वास्तविक उन्हाळ्यात एखाद्या *'हिल स्टेशन'ला* भेट देता आली असती; पण *होमटाउनचे* आकर्षण अधिक बलवत्तर ठरायचं.

बनारस ते कोल्हापूर ही यात्रा आखताना पूर्वीच्या पेशव्यांच्या उत्तर हिंदुस्तानातल्या मोहिमांची आठवण होई. *ट्रेनची* तिकिटे, बरोबर दोन महिन्याच्या प्रवास-निवासाचं सामान घेणं, दोन महिने घर बंद करून जाताना घराची सुरक्षा पक्की करणं, वाटेत मुंबई-पुणे येथे थांबल्यास त्याची सोय करणं, प्रवासातील खर्चासाठी लागणाऱ्या पैशांची व्यवस्था करणं... अशा अनेक गोष्टींची विचारपूर्वक सोय करावी लागे. बरोबर न्यायच्या सामानाचे १५-२० डाग असत. आजच्या अनुभवाशी तुलना करता कोल्हापूरची मोहीम किती जिकिरीची असे, याची जाणीव होते.

वडील मंडळी तयारी करण्यात गढलेले असताना, अनंत आणि मी प्रवासात आणि कोल्हापूरातील दोन महिन्याच्या निवासात काय काय 'मज्जा' करायची याची योजना आखायचो. वाटेत मुंबई असणार तेव्हा 'जिवाची मुंबई' देखील आलीच! बनारसकडे दुर्मीळ असलेला हापूस आंब्यापासून ते अनेक गोष्टी आमच्या योजनेमध्ये असत.

योजनेपासून वास्तवात यायची वेळ म्हणजे पहाटे उठून प्रवासी सामान *गेटशी* आणायचे आणि अंघोळी उरकून बुक केलेल्या *टॅक्सीची* वाट पाहायची! '*टॅक्सी* वेळेवर येईल का' ही धाकधूक असे! पण सर्व काही वेळेवर होत जायचे आणि आठ आसनी *स्टेशन वॅगनमध्ये* बसून (कोणाला कुठली खिडकी हा तात्पुरता वाद झाल्यानंतर!) आम्ही मोगलसराईच्या दिशेने प्रस्थान ठेवत असू. मोगलसराई जंक्शनमधून वेगवेगळ्या दिशेने आगगाड्या जात. आम्हाला हवी असलेली 'बॉम्बे मेल' नऊच्या सुमारास हावडाहून येत असे आणि अर्धा तास थांबत मुंबईच्या दिशेने निघे.

मोगलसराई स्टेशनवर आमचे 'प्रचंड' सामान प्लॅटफॉर्मकडे न्यायला हमाल लागत. हमाल ठरवणं, त्यांच्यावर लक्ष ठेवणं आदि करायला तात्यासाहेबांनी दोन विद्यार्थी बरोबर घेतलेले असायचे. त्यापैकी एक आमच्या अनुपस्थितीत आमच्या घरी दोन महिने



वार्षिक देणगीदार – • श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे • श्री. आदित्य मोडक, डोंबिवली
• एक हितचिंतक, नाशिक – कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ

राहणार असायचा. एरव्ही घरात कोणी राहत नाही, असं दिसून आल्यास घरफोडी करणारे चोर लक्ष ठेवून असत!

धावपळ नको, म्हणून पुरेसा वेळ असल्याने तात्यासाहेब आमच्या दोघांच्या इच्छेला मान देऊन आम्हाला *प्लॅटफॉर्मवरील* 'सामिष उपाहार गृह'मध्ये ऑमलेट खायला घेऊन जात.

हा कार्यक्रम संपता संपता *'ट्रेन* आली'ची आवई उठे आणि आम्ही आमच्या सामानाकडे जाऊन उभे राहात असू. आमच्या बरोबरचे विद्यार्थी सामानावर लक्ष ठेऊन असल्याने आम्ही निर्धास्त असायचो. *ट्रेन* आल्यावर सामान चढवायला हमाल हजर व्हायचे. आम्ही *सेकंड क्लासच्या* डब्यात जिथे चार *'बर्थ'* असायचे, तिथे विराजमान व्हायचो. आरक्षणाची गरज नसे. (*फर्स्ट क्लासमध्ये* बहुदा इंग्रज प्रवासी असत.) गाडी मोठ्या स्टेशनात १५ ते २० मिनिटे तरी थांबत असे. तात्यासाहेब विचारायचे, ''*प्लॅटफॉर्मवर* शतपावली करणार काय!''

पण आम्ही दोघेही नकार द्यायचो; कारण आपण बाहेर चालत असताना गाडी सुटली तर? तात्यासाहेब मात्र एकटे जात. *प्लॅटफॉर्मवर* पुस्तकांचा *स्टॉल* असल्यास मात्र, त्यांना जास्त वेळ लागे. आम्हाला भीती की, पुस्तकांच्या नादात त्यांची गाडी चुकली तर? पण आमचे वडील पुस्तकांचे शौकीन असले, तरी सदा वेळेचे भान ठेवून असत. निघण्यापूर्वीची शिटी वाजेपर्यंत ते डब्यात आलेले असत!

बॉम्बे मेलचा प्रवास साधारण २८ ते ३० तासांचा असे. गाडी व्ही. टी. (व्हिक्टोरिया टर्मिनस) वर पोचण्यापूर्वी दादर स्टेशनात ४-५ मिनिटे थांबत असे. आमचा मुंबईतील निवास नारायण राव व्यासांच्या (व्यासमामा) घरी किंवा सरदारगृहात असे.  त्यानुसार आमचे व्ही.टी. किंवा दादरला उतरायचे ठरत असे. स्टेशनवर हमालांच्या ताब्यात सामान हातगाडीवरून नियोजित ठिकाणी व्यवस्थित पोहोचत असे.

बाहेरगावचा माणूस मुंबईत आल्यावर भांबावून जातो आणि त्याला काय करू काय नको असं होऊन जातं. आम्हा दोघांची तीच अवस्था व्हायची; पण सुदैवाने तात्यासाहेब मुंबईत चार वर्षे राहिले होते.

बस आणि ट्रॅमचा प्रवास वरच्या मजल्यातून, मराठी चित्रपट, मराठी नाटक, सर्कस इत्यादी, राणीचा बाग, मलबार हिलवरील हँगिंग गार्डन, चौपाटी, तेथे शहाळे, भेळ इत्यादी.

चार दिवसांच्या मुंबईच्या वास्तव्यात यातील जे काही जमेल ते करायचे, हे आधीच ठरलेलं असायचं!

आता कोल्हापूरचे वेध लागले असल्याने, आम्ही 'पुणे' येतानाच्या परतीच्या प्रवासासाठी सोडून कोल्हापूरची गाडी पकडत असू. आमच्या तिथपर्यंतच्या प्रवासातील गाड्यांच्या तुलनेत कोल्हापूरची *ट्रेन* संथपणे जाई. रात्री दहाच्या सुमारास निघून कोल्हापूरात सकाळी आठच्या सुमारास पोहोचावी, ही अपेक्षा!  पण प्रत्यक्षात ती तास दोन तास उशिराच पोहोचायची!

अखेर आम्ही आमच्या दीर्घ प्रवासाच्या प्रमुख पर्वात पोहोचायचो...

कोल्हापूर स्टेशनात आमच्या स्वागतासाठी अनेक आप्त-स्वकीय हजर असत. त्यातील काही तात्यासाहेबांना त्यांच्या महाद्वार रस्त्यावरील

**जरूर पाहा : यलो (२०१४)** - मराठी - डाऊन सिंड्रोमवर मात केलेल्या जिद्दी जलतरणपटूची कहाणी.

**वार्षिक देणगीदार - • डॉ. प्रियव्रत देशपांडे, चेन्नई • सौ. गीतांजली जोशी, सिकंदराबाद**



घरी नेण्यासाठी, तर बाकीचे आम्हा तिघांना (ताई, अनंत आणि मी) भेंडेगल्लीत आमच्या आजोळी घेऊन जाण्यासाठी असत. स्टेशनवर अनेक टांग्यात आम्ही व आमचे सामान भेंडेगल्लीसाठी, तर वडिलांचे सामान महाद्वार रस्त्याकडे स्वागतासाठी आलेल्यांच्या देखरेखीखाली रवाना होई.

भेंडेगल्लीतल्या प्रचंड हुजूरबाजार वाड्यात आमचे बस्तान बसले की, तेथून नारळीकर सदनात जाऊन काका-काकींना नमस्कार करून यायचं, हा पहिल्या दिवसाचा 'कार्यक्रम' असे. सुदैवाने दोन्ही घरातील अंतर फार नसून पायी दहा-बारा मिनिटांचे असेल.

तो कार्यक्रम पुरा करून आल्यावरच जेवण! मावशींच्या अधिपत्याखाली स्वयंपाकघर असे. 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि,' असं तिचं वर्णन योग्य ठरावं.

कोल्हापूरात आमचे खेळगडी म्हणजे दोघं मावसभाऊ विनय आणि विजय मोघे. पाच मामा, माझ्या दोन मावश्या, त्यांची मुलं असा मोठा गोतावळा हुजूरबाजार वाड्यात होता.


आमचे 'खेळ' म्हणजे लपंडाव, वाड्याच्या मोकळ्या भागात क्रिकेट, फुटबॉल आदी तर शहरात लांब फेरफटक्याची ठिकाणं म्हणजे रंकाळा, जुना राजवाडा, साठमारी, रेल्वे स्टेशन, टेंमलाई, आदी. त्यावेळी खाद्यपदार्थात आंबोळी, मिसळ, आईसक्रीम खास *सेलीब्रेशन* म्हणून...

अनंत आणि मी ५-६ वर्षाचे असताना नानामामा आणि त्यांचे एक मित्र

गरुडाहून झेपावणारा, प्रत्येकाला प्राण आहे। विश्वास ठेवा, तुमच्या पायात न संपणारं त्राण आहे।।



वार्षिक देणगीदार - • सौ. वैशाली पाटील-देवरे, शिरपूर, जि. धुळे • सौ. सीमा परांजपे, पुणे
• श्री. विद्यानंद देवधर, कोल्हापूर



जुना राजवाडा

सायकलीवर बसवून आम्हाला बरेच लांब (सात आठ मैल) फिरायला नेत.

पण नानामामांशी विशेष संबंध आला तो पहाटे पंचगंगेत पोहणं शिकताना! ताईने एका वर्षी आम्हा दोघांना पोहायला शिकवायची *'ऑर्डर'* नानामामांना दिली. पहाटे ५ वाजता उठून मैल दीड मैल पंचगंगेकाठी चालत जाऊन मग पाण्यात उतरून नानामामा सांगतील, तसे हात पाय मारायचे. तेव्हा वाटे, सुट्टीत हा उपद्व्याप कशाला; पण इलाज नव्हता. आमची प्रगती किती झाली, ते परत येताना नानामामा सांगत, 'रुपयात चार आणे, आठ आणे' आदी. त्यांचे एक मित्र औंधकर हे देखील त्यांच्या मदतीला होते. शेवटच्या दहा दिवसांत आम्हाला दहा आण्यापर्यंत पोचता आले आणि सर्दीतापाचा त्रास सुरू झाला! डॉक्टरनी सांगितलं 'पोहणं बंद करा!' पण आजार तीन दिवसांत पळाला आणि ताईने पुन्हा पोहण्याचा उपक्रम सुरू केला. शेवटच्या दिवशी का होईना आम्ही सोळा आण्यापर्यंत पोहोचलोच!

पन्हाळा आणि जोतिबाच्या दिवसभराच्या *ट्रिप्स* हे कोल्हापूर यात्रेचे खास आकर्षण! *टॅक्सीवाला* शेख आपली स्टेशन वॅगन घेऊन यायचा. भेंडेगल्ली आणि महाद्वार येथून आम्ही साधारण दहा जणं निघायचो. आमच्या कोल्हापूर वास्तव्यात कधीकधी शास्त्रीय संगीत (धोंडूताई कुलकर्णी), नकला, पोवाडे (नानिवडेकर) इत्यादीचा कार्यक्रम होत असे. हे कलाकार माझ्या वडिलांच्या सत्काराप्रीत्यर्थ असे कार्यक्रम करीत असत. अशाप्रसंगी हुजूरबाजार वाड्यातून म्हशीचे उच्चाटन परसात करून, साफसफाई करून गोठ्याचं रूपांतर *स्टेजमध्ये* केलं जाई. कार्यक्रम रात्री नऊला सुरू होऊन मध्यरात्री पर्यंत चाले. मध्ये १५-२० मिनिटांचा *'कॉफी ब्रेक'* असे. निमंत्रितांची संख्या ५० पर्यंत असायची!

कोल्हापूरातल्या पॅलेस *थियेटरमध्ये* 'मानापमान' पाहिल्याचे अंधुकसं आठवतंय. रात्री नऊच्या सुमारास सुरू झालेल्या नाटकाचा जेमतेम पहिला प्रवेश पाहून आमची ब्रम्हानंदी टाळी लागायची, ती पहाटे तीनच्या आसपास आईने हलवून जागे करीपर्यंत! (एकदा सकाळी आम्ही चौघं-पाच जण पॅलेस *थियेटरमध्ये* डोकावून आलो होतो. त्यावेळी नाटकाचा सराव चालू होता. आमच्यापैकी म्होरक्याने एका महत्त्वाच्या

जरूर पाहा : ब्लॅक (२००५) - हिंदी - एका अंध मुलीचा शिक्षणासाठी संघर्ष.

वार्षिक देणगीदार - • डॉ. नीरज रायते, पुणे • चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे • श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे

पात्राकडे बोट दाखवून सांगितलं होतं, 'हे बालगंधर्व!')

सिनेमे पाहायची पण मुभा होती. त्यासाठी आम्ही मुलेच तीनच्या *'शो'ला* जाऊन यायचो. फुटाणे खायला एखाद्या मामाने तिकिटाशिवायचे बजेट वाढवून दिलेलं असायचं.

परतीच्या प्रवासात आमचा पुण्यात ३–४ दिवसांचा मुक्काम असायचा. बऱ्याच वेळा रँग्लर परांजपे यांच्या आमंत्रणाने आमची राहायची सोय त्यांच्या घरी व्हायची. त्यावेळी शकुंतलाबाई आमचे आतिथ्य बघायच्या.

माझे वडील सांगत असत की, असे दोन महिन्याकरता कोल्हापूरात आलं की, सुरुवातीच्या दिवसात त्यांना रस्त्यावर फिरायला जाताना भेटणारे म्हणत, ''आहात ना इथे, मग सावकाशीने भेटू.''

पुढे एकदोन आठवड्यांनी भेटलेले म्हणत, ''अजून इथेच का?''

पण जूनअखेर आमच्या सामानाची बांधाबांध करून कोल्हापूर स्टेशनवर गेलो की, बऱ्याचशा आप्तस्वकीयांनी पुढे जाऊन डब्यात जागा पकडलेली असे. आम्ही आलो त्या दिवशी सकाळी उत्साहाचे वातावरण असे, तर जाताना सगळे उदास असू; पण आता कोल्हापूर–पुणे–मुंबई–मोगलसराई हा उलटा मार्ग सुरू झालेला असे. पुणे, मुंबई येथे येताना करत असू तसा सरदारगृह किंवा व्यासभुवन येथे परत जाताना मुक्काम असे.

जून म्हणजे पाऊस जोरात! पण सुदैवाने आम्हाला कधी मुंबईच्या पावसाचा फटका बसला नाही. कलकत्ता मेल रात्री नऊच्या सुमारास सुटायची मध्यप्रदेश सुरू झाला की, तापमान चढे. मोगलसराई *स्टेशन* रात्री बाराच्या सुमारास आलं की, झोपाळलेल्या अवस्थेत खाली उतरून सामान घ्यायला वडिलांचे विद्यार्थी हजर असत. *स्टेशन वॅगन* देखील त्यांनी आणलेली असायची.

घरी पोचायला पहाटेचे चार वाजलेले असायचे. दोन महिने बंद घरात हळूहळू बस्तान बसायला सुरुवात होई. दुपारी खेळगडी आले की, आम्ही त्यांना थोडक्यात प्रवासवर्णन सांगणार, हे अगदी ठरलेले असायचे...!

❖❖

**– जयंत नारळीकर**

jvn@iucaa.in

वाचा
ललित : पाढ्याचे गाणे
लेखक – मल्हार अरणकल्ले

## किस्से शास्त्रज्ञांचे

- सुप्रसिद्ध संशोधक **एडिसन** यांनी बरेच शोध लावले होते. त्याबद्दल एकदा त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराचे भाषण करताना एक वक्ता फोनोग्राफचा उल्लेख करून म्हणाला, ''एडिसन यांनी बोलणाऱ्या यंत्राचा शोध लावला आहे, असे आता सांगण्यात आले.''
  नंतर सत्काराला उत्तर देताना एडिसन म्हणाले, ''बोलणाऱ्या यंत्राचा शोध मी लावलेला नाही. ते परमेश्वरानेच निर्माण केलेले आहे. मी शोध लावलाय, तो केव्हाही ज्याचे बोलणे बंद करता येईल अशा यंत्राचा !''



वार्षिक देणगीदार – • सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका
• डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, शेफिल्ड, यु.के. • डॉ. संजय गद्रे, धुळे



कविता

# मीही लुटेन अक्षर-खजिना...

पेपर गठ्ठे बांधुन पाठी, जड होते सायकल,
पायांमध्ये येतात गोळे, मारून मारून पॅडल.

बातम्या, माहिती, लेखांचा एवढा मोठा खजिना.
पाहोचवतो मी घराघरातुन रोज उजाडताना

अंदाजानेच ओळखतो मी पेपरावरचं नाव,
अक्षरांशी ओळख अजून झाली नाही राव

थंडी-वाऱ्यात कुडकुडतो मी, पावसात चिंब भिजतो,
चुरगळता, भिजू न देता, पेपर द्यावा लागतो.

सुट्टी घ्यावी कधी, पेपर दुसरा द्यावा चुकून,
चुका असल्या चालत नाहीत, पगार जातो कापून.

घराघरातुन शाळेसाठी निघती छोटी मुलं.
शिकण्यासाठी झुरतं तेव्हा मन माझंही खुळं.

गणवेश-फी-वह्या-पुस्तकांपुरती जमेल पुंजी,
शाळेत मीही जाईन, होईल अक्षर ओळख माझी.

नावं वाचुन, नेमके पेपर देईन नेमक्या घरी,
पेपरातला अक्षर - खजिना लुटेन तेव्हा तरी

पेपर वाचुन, शाळा शिकून, मोठा होईन राव,
पेपरमध्ये छापुन येईल माझा फोटो - नाव.

**- डॉ. सुमन नवलकर**
ए/२० ज्योती बिल्डिंग प्लॅट नं. ४३/४५
बरकत अली दर्गा मार्ग, वडाळा (पूर्व) मुंबई 400037

ऐका - कविता रसास्वाद
'डबेवाल्याचं पोर'
कवयित्री व वाचनस्वर
डॉ. सुमन नवलकर

**छात्र प्रबोधन मासिकाचे आजच सभासद व्हा!**


वार्षिक वर्गणी : ₹ २००
इ-अंक वार्षिक वर्गणी : ₹ १००

ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी jpprakashane.org या संकेतस्थळाला भेट द्या!!
subscription / सभासदत्व येथे क्लिक करा!

**जरूर पाहा : नील बटे सन्नाटा (२०१५)** - हिंदी - मुलीला शिक्षणासाठी प्रेरणा देणाऱ्या आईची कथा.

वार्षिक देणगीदार - • श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे • श्री. सागर सुराणा, पुणे • सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे

**वाचलेच पाहिजे असे काही...**




ग्रामीण भागात राहणारे, जनसामान्यांशी घट्ट ऋणानुबंध असणारे आणि तरीही बदलत्या जगाचे भान असणारे, संवेदनशील लेखक राजन गवस यांच्या लेखनातून उपेक्षितांच्या जीवनासंबंधी असणारी तळमळ उत्कटपणे व्यक्त होते.

२००९ साली 'साधना' साप्ताहिकात लेखक राजन गवस यांचे 'कैफियत' या नावाचे सदर प्रसिद्ध झाले. या सदराला वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला आणि वर्षभरानंतर याच नावाने त्यात आणखी दहा अप्रकाशित लेखांची भर टाकून 'कैफियत' हे पुस्तक साधना प्रकाशनाने २०१० साली प्रकाशित केले. अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, जातीयता, दारिद्र्य, राजकारण, समाजकारण, पर्यावरण, झपाट्याने बदलत चाललेली जीवनशैली-मूल्ये, आदि विषयांवर लेखकाने या लेखांतून प्रकाश टाकला आहे.

आजचं गाव-खेड्यातील धगधगीत वास्तव समोर आणलं आहे. खेड्यातील जीवनाचे प्रतिबिंब या लेखांमधून उमटलेले आहे. ग्रामीण बोलींचा लहेजा, त्यामधील निरागस रांगडेपणा मनाला भिडतो.

खेड्यांच्या बदलत्या जीवनाचे विदारक वास्तव आपल्या डोळ्यांसमोर उभे करण्याची ताकद आणि कसब त्यांच्या लेखणीत आहे. शहरे आणि खेडी यांच्यातील अंतर वाढत असताना खेड्यांचे शहरीकरणही झपाट्याने होत आहे. शहरातील तथाकथित सुखसोयींची भुरळ खेड्यातील आजच्या तरुणाला पडली आहे. या सुखसोयी प्राप्त करण्याच्या प्रयत्नातून काही हास्यास्पद तर काही परस्पर विसंगत गोष्टीही घडतात.

हे पुस्तक वाचताना या गोष्टी आपल्याला हसवतात, निराश करतात आणि प्रसंगी डोळ्यांत पाणीही आणतात.

खेड्यांचे शहरीकरण व्हायला लागले. औद्योगिक संस्कृती ग्रामीण जीवनात झिरपू लागली. शोषणाची एक नवीन प्रक्रिया ग्रामीण जीवनात सुरू झाली. निवडणुकीचे राजकारण, कार्यकर्ते, पतसंस्था, शासकीय यंत्रणा यांचा दबदबा ग्रामीण जीवनात वाढू लागला. गावगाड्यावर याचा झालेला परिणाम हे सर्व या पुस्तकाच्या केंद्रस्थानी आहे. अशा सामाजिक संस्था, खेड्यांमध्ये शिरकाव करणाऱ्या या प्रवृत्ती एकूण गावगाड्याच्या अस्तित्वाला, एकसंधतेला, संस्कृतीला, पर्यावरणाला कशा मारक आहेत, याचे नेमके चित्रण या पुस्तकातील सर्वच लेखांमधून अत्यंत वास्तवदर्शी पद्धतीने झालेले दिसते.

खेड्याला झालेली राजकारणाची लागण, शिक्षण संस्थांचं फुटलेलं पेव, इंग्रजी माध्यमात मुलांना शिकवण्यासाठी सुरू असलेली चढाओढ, तरुणांचा अनिश्चित भविष्यकाळ, लयाला जाणारी गावगाड्याची संस्कृती आणि फोफावणारी धेडगुजरी शहरी संस्कृती यांच्या कचाट्यात सापडलेल्या भोळ्या समाजाचं चित्रदर्शी वर्णन लेखक करतात.

सामर्थ्याच्या बळावर अन्यांस ना छळावे। स्वतःप्रमाणे दुसऱ्याचेही मन जाणत जावे।।

वार्षिक देणगीदार - • बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे • एक हितचिंतक, पुणे • सौ. किरण मुसळे - कुलकर्णी, सातारा

स्वत:चे बालपण, तरुणपण, उमेदवारीचे दिवस खेड्यात जगल्याने लेखकाला इथल्या समाजाची नस अचूक सापडली आहे. याचे दाखले आपल्याला पदोपदी आढळतात. राजकारण या लेखात शे-दिडशे उंबऱ्यांच्या, जिथे रस्ता पोचला नाही; पण *मोबाइल* मात्र पोचला आहे, अशा राजकारणाने झपाटलेल्या गावाचं वर्णन करताना राजन गवस लिहितात, ''संध्याकाळी गावात सहज चक्कर टाकली तर ज्या-त्या पक्षाचे लोक घोळक्यानं चकाट्या पिटत बसलेले दिसतील. यात तरुणांचा भरणा अधिक. प्रत्येक पक्षाचा तालुक्याचा नेता हा त्या त्या घोळक्याचा देव. त्या देवाचा शब्द अंतिम. त्यानं जीव द्यायला सांगितला, तरी हा घोळका क्षणात तयार होणार. त्या बदल्यात नेता यांना देणार काय? तर मटनाचा रस्सा आणि दारूची बाटली. त्यासाठी ते वाट्टेल ते करतील.''

आपल्यासारख्या शहरी लोकांच्या खेड्याबद्दलच्या कल्पना किती अवास्तव आणि *रोमॅन्टिक* असतात याची बोचरी जाणीव हे पुस्तक वाचल्यावर होते. आपल्या कल्पनेतले रम्य खेडे आणि या पुस्तकातून दिसणारे खेडे यांचे चित्रण आपल्याला अस्वस्थ करते. लेखक राजन गवस आपल्या या पुस्तकाबद्दल म्हणतात, ''जीवन जगत असताना माझ्या सभोवताली जे घडलं ते तसंच 'कैफियत'मध्ये शब्दबद्ध केलं आहे. सर्वसामान्यांच्या जीवनाची ही 'कैफियत' आहे... आज आधुनिकता खूप जोरात आपल्यावर येऊन आदळते. जे नवे येत आहे, ते स्वीकारण्यासाठी व पचवण्यासाठी वेळही मिळत नाही. माझा नव्याला विरोध नाही; पण नवं येतं तेव्हा त्याला समजून घेतलं पाहिजे. ते पचवायला वेळ मिळाला पाहिजे. प्रगतीच्या नावाखाली कोणत्या वाळवंटाची निर्मिती करण्यात आपण गुंतलो आहोत?...'' असे प्रश्न विचारून ते वाचकाला अंतर्मुख करतात. स्वत:ची, स्वत:बरोबर इथल्या प्राणी-पक्ष्यांची-निसर्गाची पोटतिडकीने 'कैफियत' मांडतात. आज समाजात काही प्रमाणात का होईना संवेदना, संवेदनशीलता जिवंत आहे. ती संवेदना 'कैफियत' या पुस्तकात मांडली आहे.

| | |
|---|---|
| **पुस्तकाचे नाव** | : कैफियत |
| **लेखक** | : राजन गवस |
| **प्रकाशन** | : साधना |
| **पृष्ठ संख्या** | : १५२ **किं.** : ₹ १५० |

**– दीपा पळशीकर**
साईराज अपार्टमेंट, शारदानगर, गंगापूर रस्ता, नाशिक 422013

## शब्द एक क्रियापदे अनेक...

एकच शब्द; पण त्याबरोबर वेगवेगळी क्रियापदे आली, की शब्दांचे अर्थ बदलत जातात. पुढे एक शब्द व काही क्रियापदे दिली आहेत. ते जोडून होणाऱ्या **वाक्प्रचारांची वेगवेगळ्या अर्थांची वाक्ये तयार करा.**

**शब्द – नजर**
**क्रियापदे** – लागणे, पडणे, टाकणे, असणे, देणे.
**शब्द – तोंड**
**क्रियापदे** – देणे, दाखविणे, टाकणे, फिरवणे, येणे.
**शब्द – अंग**
**क्रियापदे** – चोरणे, टाकणे, धरणे.

**जरूर पाहा : अपोलो १३ (१९९५)** – इंग्रजी – अपोलो १३ या चांद्रयानाची गुंगवून ठेवणारी कथा.

वार्षिक देणगीदार – • डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे • एक हितचिंतक, पुणे • डॉ. अमित हरताळकर, चोपडा, जि. जळगाव

# हक्काची पोळी

कथा

– डॉ. प्रदीप आवटे

**असंख्य अडचणी होत्या, गरिबी होती; पण तरी बाळू जिद्दीनं शिकला. सुनीलने परत मागितलेली पुरणपोळी तर सतत त्याच्या सोबत होती. अनेकांच्या मदतीने बाळू इंजिनिअर झाला. त्याने स्वत:ची कंपनी सुरू केली. एवढंच नाही, तर गरजू लोकांना रोजगाराबरोबरच हक्काची भाकरही दिली. वाचू या बाळूच्या जिद्दीची ही प्रेरणादायी कथा...**

''सालगडी?'', मुलांच्या चेहऱ्यावर भले थोरले प्रश्नचिन्ह होते. प्रमुख पाहुण्यांनी ते ताबडतोब वाचले.

''अरे, गावाकडे शेतासाठी पूर्ण वर्षभर काम करण्यासाठी गडी ठेवतात, त्याला वर्षभरासाठी किती मजुरी द्यायची ते ठरवतात, त्याला 'सालगडी' म्हणतात. कधी तो खाऊन-पिऊन असतो, तर कधी कोरडा.''

मुलांना सालगडी म्हणजे काय, हे जरासं लक्षात आलं. खरं म्हणजे आज मौलाना आझाद स्कूलमधील दहावीच्या बॅचचा निरोप समारंभ होता. प्रमुख पाहुणे म्हणून शहरातील सुप्रसिद्ध उद्योगपती 'पृथ्वीराज पडवळ'आले होते. त्यांनी नेहमीसारखं मुलांनी अभ्यास कसा करावा, परीक्षेला सामोरं कसं जावं, दहावी हे कसं करियरचं प्रवेशद्वार आहे, असं काहीही न सांगता चक्क एक गोष्ट सांगायला सुरुवात केली; त्यामुळं पोरं जाम खूष होती. पोरं कानात जीव आणून गोष्ट ऐकत होती.

गावाकडल्या बाळू नावाच्या एका मुलाची गोष्ट होती. बाळू शाळकरी मुलगा, दहा- बारा वर्षांचा! जिंती नावाच्या छोट्याशा खेड्यात राहणारा. बाळूची घरची गरिबी होती. त्याचे वडील म्हणजे तात्या गावातल्या दादासाहेबांच्या शाची ती झोपडी आणि ते शेत लई म्हंजी लई आवडायचं. हुंदडायला एवढी जागा, झाडं, पोहायला विहीर त्याला मज्जाच मज्जा यायची.

अरे हो, एक सांगायचं राह्यलंच! दादासाहेबांच्या वाड्यासमोर त्यांची जीप रुबाबात उभी असे. त्या काळात गावात ती एकच चार चाकी गाडी होती. बाळूला त्या चार चाकी गाडीचे खूप अप्रूप वाटे. एकदा तर तो हळूच त्या जीपजवळ गेला आणि त्याने कशाला तरी हात लावला, तर एकदम गाडीचा हॉर्न जोरात वाजला आणि झाडाखाली उभा असलेला जीपचा ड्रायव्हर एकदम धावतच आला आणि त्याने ओढतच बाळूला जीपपासून दूर




जगण्याची ओढ अशी, उडण्याचे वेड असे। घरट्याच्या लोभातही, गगनाचे भव्य पिसे।।

वार्षिक देणगीदार – • श्री. शिवप्रसाद आगटे, पुणे • श्री. अतुल जोशी, पुणे • गेझनर इंडिया प्रा. लि., पुणे

केलं, ''ए पोरा, सांगून ठिवतूया, पुन्हा जर गाडीला हात लावला ना तर तंगडंच तोडीन..!''

बाळूने त्याच्याकडे एकदम रागारागाने पाह्यलं, तर शेजारी उभं असलेलं कुणी तरी म्हणालं,

''सालगड्याच्या पोराला कशाला रं एवढा तोरा?''

बिचारा बाळू एकदम हिरमुसला होऊन आपल्या खोपटात आला; पण नंतर कधी त्यानं त्या जीपला हात लावला नाही. तो लांबूनच त्या जीपकडे पाहायचा.

गावात सातवीपर्यंत शाळा होती. बाळू, त्याची बहीण छाया आणि दादासाहेबांचा मुलगा सुनील त्याच शाळेत जात. सुनील आणि बाळू एकाच वर्गात होते. बाळू तसा अभ्यास फार करायचा नाही; पण शाळेत काळे गुरुजी जे शिकवायचे ते त्याला लगेच समजायचं आणि त्याच्या लक्षातही राहायचं. वर्गात तो कायम पहिला असे. काळे गुरुजींचाही तो लाडका होता.

माईसाहेब म्हणजे दादासाहेबांच्या पत्नी. त्यांचा खूप दरारा होता गावात! उंच्यापुऱ्या माईसाहेब अगदी भारदस्त दिसायच्या. गावातील महिलांसाठी, मुलांसाठी त्या छोटेमोठे कार्यक्रम घ्यायच्या. गावात होळीचा सण जोरदार साजरा व्हायचा. दादासाहेबांच्या वाड्यासमोर मोठी होळी पेटायची. होळीच्या जाळात भाजलं गेलेलं खोबरं, खायला खूप खमंग लागायचं. बाळू आणि सगळी बच्चे कंपनी पोटभर खोबरं खायचे त्या दिवशी! माईसाहेबांचा एक रिवाज होता, त्या दिवशी संध्याकाळी शेतातल्या सगळ्या बच्चे कंपनीला पुरणपोळी खायला त्या घरी बोलवायच्या. चुलवणावर भाजलेली खमंग पोळी आणि त्यावर तुपाची धार, सोबत दूध! पोरं अगदी आडवा हात मारायची. माईसाहेब स्वतः मुलांना प्रेमाने वाढत. अशाच एका होळीची गोष्ट आहे ही.

होळी झाली. त्या संध्याकाळी बाळूने माईसाहेबांनी वाढलेली खमंग पोळी दुधासोबत आवडीने खाल्ली. दुसऱ्या दिवशी तालुक्याच्या गावी स्कॉलरशिपची परीक्षा होती. बाळू आणि सुनील दोघेही परीक्षेला बसले होते. सुनीलचा नंबर नेमका बाळूच्या पाठीमागे आला होता. सकाळी अकराला परीक्षा सुरू झाली. भाषा, गणित आणि बुद्धिमत्ता चाचणी असे तीन पेपर होते. परीक्षा सुरू असतानाच सुनील बाळूला पेनने डिवचू लागला. बाळूने मागे वळून विचारले,

''सुनील, गप्प बस ना. मला पेपर लिहू दे.''

''तुझा पेपर मला दिसेल असा ठेव ना.''

बाळूने त्याच्याकडे दुर्लक्ष केलं; पण तो ऐकेचना. तुझा पेपर मला दे, म्हणून तो हट्ट करू लागला; पण बाळूने काही त्याचे ऐकले नाही.

मग काय! परीक्षेवरून येताना दोघांचे जोरात भांडण सुरू झाले.

''तू हुशारेस म्हणून लय भाव खातू काय?'' सुनील रागारागात म्हणाला.

''भाव कशापायी खावू? तुला दाखवताना सरांनी पाह्यलं असतं म्हंजी, दिलं असतं दोघांनाबी हाकलून,'' बाळू म्हणाला.

''साधं उत्तर दाखवत नाय बाळ्या तू, आन आमच्या घरी पुरणपोळी खाताना लै ग्वाड वाटतंया न्हवं..''

''आरं पन..''

''आमची पोळी दी माघारी पैली,'' सुनील वेड्यासारखा बाळूच्या अंगाला झोंबत म्हणू लागला.

''आता काल खाल्लेली पोळी कशी काय परत देनार रं मी?'' बाळूला मोठं कोडं पडलं.

''मला काय त्ये ठावं नाय. मला उत्तर दावत नाय, तर पोळी दे माघारी.''

संध्याकाळी घरी परतेपर्यंत हे भांडण चालू राह्यलं. मग दोघांची कट्टी झाली. बाळूला रात्रभर झोप लागली नाही. काल सुनीलच्या घरी खाल्लेली पोळी त्याच्या पोटात उडया मारू लागली. जणू तिला बाहेर पडायचं होतं. त्याला कससंच होऊ लागलं. कधी एकदा सकाळ होतेय, असं झालं होतं बाळूला.

सकाळ होताच तो सुनीलच्या घरी गेला आणि माईसाहेबांसमोर जाऊन उभा राहिला. काय करावं त्याला कळेना. माईसाहेब काही

**जरूर पाहा : आय ॲम कलाम (२०१०)** – हिंदी – अब्दुल कलामांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या एका गरीब मुलाची गोष्ट.

वार्षिक देणगीदार – • डॉ. कीर्ती आपटे, पुणे • श्री. नागेश साने, पुणे • श्रीमती लीला आचवल, नाशिक

तरी कामात होत्या. त्यांचं बाळूकडे लक्ष जाताच त्या म्हणाल्या,

''का रे बाळू, इथं का थांबलाहेस असा. तुला काही पाहिजे का?''

काही न बोलता तो तसाच उभा राह्यला.

''अरे बोल ना..''

मग एकदम एका दमात बाळू बोलू लागला,

''पोळी परत मागायची असंल, तर पोळी खायला कशापायी बोलवता मला?''

माईसाहेब गोंधळल्या. हा चिमुरडा पोर काय बोलतोय तेच त्यांना कळेना.

''अरे कुणी मागितली तुला पोळी परत?'', माईंनी विचारलं.

''तुमच्या सुनीलला ईचारा की'', बाळू घुश्श्यातच बोलला.

''अरे तूच सांग की काय झालं ते'', आणि मग बाळूनं त्यांना सगळा प्रसंग सांगितला. तर त्या हसू लागल्या. म्हणाल्या,

''अरे, सुनील वेडा आहे. मी सांगते त्याला, तो नाही परत मागणार पोळी. तू मात्र दर होळीला आमच्याकडं पुरणपोळी खायला यायचं बरं.''

''मला नकू तुमची पोळी..'', असं म्हणून बाळू तिथून पळूला.

झाला प्रकार रात्री तात्यांना समजला. त्यांना वंगाळ बी वाटलं आणि बाळूचा राग बी आला. रागाच्या भरात त्यांनी बाळूला दोन कानफाडीत लावल्या.

''आरं, आपून कामकरी मान्सं.. असं बोलत्यात व्हय रं माईसाहेबांना. त्यांचं हिरदय मोठं म्हनून त्यांनी हसन्यावारी नेलं. गरिबाला एवढा तोरा बरा नाय बाबा'', राग ओसरल्यावर तात्या म्हणाले.

''आन एवढाच राग असंल ना तुज्या नाकावर, तर सवताची हक्काची पोळी मिळवण्याइतका शाना हू'', आई भाकऱ्या थापता थापताच बोलत होती.

''आये, मी माझी पुरणपोळी तर मिळवीनच गं; पन आपल्या सारख्या गरिबांना बी हक्काची भाकर मिळवून दीन'', बाळू बेंबीच्या देठापासून म्हणाला. आणि खोपटाच्या बाहेर अंधारात आभाळाकडं बघत उभा राह्यला. आभाळातल्या चांदण्या त्याला खुणावत होत्या. आत आई भाकऱ्या थापत होती, चुलीत अंगार पेटला होता.

''हक्काची भाकर हे नाव वाचलंय मी कुठंतरी'', मागच्या बाकावरली संगीता मध्येच म्हणाली.

''हो अगं, आपल्या बसस्टॅण्डच्या समोरच तर आहे. तिथं कष्टकरी मजुरांना एक रुपयात भाकरी-भाजी मिळते.'' सुकेशिनी म्हणाली.

''मुलांनो, ते केंद्र पडवळ साहेबांनीच सुरू केलेलं आहे. गेल्या दहा वर्षांपासून किती तरी कष्टकऱ्यांनी त्याचा फायदा घेतला आहे'', सुतार सरांनी माहिती दिली.

''म्हणजे माझ्या लक्षात आलं,'' सिद्धार्थ म्हणाला. ''या गोष्टीतला बाळू म्हणजेच...!''

पडवळ साहेब हसले आणि म्हणाले,

''बरोबर ओळखलंस दोस्ता..! ही माझीच गोष्ट आहे. अडचणी होत्या, गरिबी होती; पण मी शिकत गेलो. सुनीलने परत मागितलेली ती पुरणपोळी सतत सोबत होती. अनेकांनी मदत केली. इंजिनिअर झालो. स्वतःची कंपनी सुरू केली. आज माझ्या कंपनीत हजाराहून अधिक कामगार काम करतात. माझ्या व्यवसायामुळे अनेक गरजू लोकांना रोजगार मिळाला, याचा आनंद वाटतो. रोज कष्टकऱ्यांचे लोंढे शहरात येतात, त्यांच्यासाठी 'हक्काची भाकर'केंद्र सुरू केलं. तात्या आणि आई आज थकलेत; पण तेच हे केंद्र चालवतात; आणि हो, दर होळीला तिथं खमंग पुरणपोळी असते.

''आई कधी-मधी बोलते, 'तू तुजा शबूद खरा केलास लेकरा,'तेव्हा मला करिअरचा खरा अर्थ कळतो दोस्तांनो!''

पाहुणे बोलायचे थांबले; पण पोरांचे ओले डोळे बोलत राहिले बराच काळ!

✤✤


**– डॉ. प्रदीप आवटे**
सोबा विहार, उजवी भुसारी कॉलनी,
कोथरुड डेपो, पुणे - ३८

(पूर्वप्रसिद्धी - छात्र प्रबोधन-
सुबोध दिवाळी विशेषांक, नोव्हें.२०१८)

भिंतीबाहेर आहे जग, त्याचा शोध घे। स्वतःच्याच अनुभवातून, स्वतः बोध घे।।

वार्षिक देणगीदार - • श्री. रवींद्र पालेकर, पुणे • श्री. राहुल भिडे, पुणे • सौ. सुमेधा अरूण केळकर, पुणे

## ओळखा पाहू, चित्रात दडलेल्या म्हणी...



**चि. कृष्णा बोर्डे** (इ. ७ वी), जवाहरनगर, अकोला
**हस्तलिखित** – स्वप्नपूर्ती

जरूर पाहा : चिल्लर पार्टी (२०११) – हिंदी – भिडूला वाचवण्यासाठी केलेला संघर्ष.

वार्षिक देणगीदार – • श्री. विनोद कुलकर्णी, पुणे • श्री. निखिल आपटे, पुणे
• डॉ. विकास हरताळकर, चोपडा, जि. जळगाव

# छात्र प्रबोधन

## सौर वैशाख, शके १९४३। इ.स.२०२१।

## धम्माल कृती – भेट पुस्तिका

## परिसर न्याहाळताना...

मित्रांनो, एक वर्षापेक्षा अधिक काळ आपण घरात आहोत. *ऑनलाइन* क्रमिक शिक्षणासोबत अनेकांनी या काळात आपल्या अंगणात, परिसरात डोकावून प्रत्यक्ष अनुभव शिक्षणाची संधी नक्की घेतली असेल. खूप समृद्ध असं विश्व आपल्या आसपासच असतं; पण कधी आपल्याला सवड नसते तर कधी उत्साह! कधी आवश्यकता वाटत नाही, तर कधी जाणीवच होत नाही! आपल्या सभोवतालचा हा परिसर आपण डोळसपणे पाहिला लागलो तर...(या कृती करण्यापूर्वी या पुस्तिकेतील शेवटचे पान वाचा.)

## कृती १ – पक्षिनिरीक्षण

सध्या सर्वत्र कोकिळचा आवाज भरून राहिला आहे; तर दुसरीकडे कावळ्यांची घरटं बांधण्याची लगबग सुरू आहे. थोडं निरीक्षण केलं तर खूप प्रकारचे पक्षी आपल्या आसपास दिसतील. एकीकडे चिमण्या नाहीशा होताहेत अशी ओरड असली, तरी अनेक पक्ष्यांनी शहरी वातावरणाशी जुळवून टिकाव धरला आहे.

आपल्या आसपास दिसणारा कोणताही एक पक्षी निवडा व त्याचे **खालील मुद्द्यांच्या आधारे निरीक्षण करा –**

१. पक्षी दिसण्याची वेळ
२. कुठे दिसला/ जागा कोणती?
३. काय करत होता?
४. त्या प्रकारचे पक्षी किती संख्येने होते?
५. आकार चिमणीपेक्षा लहान होता की कावळ्यापेक्षा मोठा?

**पाहा – आपल्या भवतालचे पक्षी**



६. कोणत्या अवयवांचे कोणते रंग ठळकपणे लक्षात आले?
७. आवाज ऐकला का? कसा वाटला?
८. साधारणपणे नेहमी तुमच्या परिसरात दिसतो की, आजच प्रथम पाहिला?
९. पक्ष्याचा फोटो काढता आला असेल तर तो झूम करून पुढील बाबतीतील निरीक्षणे नोंदवा. त्याच्या चोचीचा आकार, शेपटीचा आकार, त्याची अन्य वैशिष्ट्ये. उदाहरणार्थ तुरा होता का? इ.
१०. उडण्याची काही विशिष्ट लकब होती का?
११. पक्ष्यांचे आवाज रेकॉर्ड करा. आवाजावरून पक्षी ओळखता येतो का बघा...

## कृती २ – पक्षिगणना

पक्ष्यांची थोडीफार ओळख झाली असेल तर आता जरा तुमच्या परिसरातील पक्षिगणना करू या. त्यासाठी –

१. तुम्हाला किमान एक आठवड्याचा कालावधी काढावा लागेल.
२. वेगवेगळ्या वेळेत परिसरात डोकवावे लागेल.
३. एका वहीत कोणते पक्षी एका वेळी किती संख्येने दिसले असे नोंदवावे लागेल. म्हणजे तुम्हाला सकाळी ३ चिमण्या दिसल्या आणि संध्याकाळी २ दिसल्या, तर तुमच्या परिसरात किमान ३ चिमण्या आहेत असं आपण म्हणू शकू. तीन व दोनची बेरीज करून पाच लिहू नका. पण समजा तिसऱ्या दिवशी तुम्हाला एकावेळी ४ चिमण्या दिसल्या, तर तुमच्या परिसरात किमान ४ चिमण्या आहेत असे आपण नक्की म्हणू शकू.
४. किमान आठवडाभर निरीक्षणे केल्यावर कोणते पक्षी एका वेळी सर्वाधिक संख्येने दिसले ती संख्या नोंदवा.
५. एका तक्त्यात ही सगळी माहिती भरा. किती प्रकारचे एकूण किती पक्षी परिसरात आहेत ती संख्या नोंदवा.

## कृती ३ – कीटक निरीक्षण

आता जो घटक आपण अभ्यासासाठी निवडला आहे, त्यासाठी तर अंगणात जायचीही गरज नाही. खूप काही तुमच्या घरातच तुम्हाला बघायला मिळेल. एक गंमत करू. आपल्या घरात, अंगणात कोणकोणते कीटक दिसतात अशी एक यादी करायला घ्या. १५ पेक्षा अधिक कीटकांची यादी सहज व्हायला हवी बरं. आता यातील एक कीटक निवडून त्याची निरीक्षणे नोंदवा.

**संधिपाद प्रजाती निरीक्षण सूची –**

१. कुठे आढळला?
२. संख्या किती होती?
३. आकार लहान होता की मोठा होता? (कशाच्या तरी तुलनेत लिहा.)
४. पायांची संख्या किती होती?
५. मिश्या, सोंड, नांगी यापैकी काय काय होते?
६. पंख होते का? पंखांची संख्या किती होती?
७. रंग कसा होता?
८. काय करत होता?
९. अन्य काही वैशिष्ट्ये जाणवली का?
१०. *मोबाइलमध्ये फोटो* काढून *झूम* केल्यावर साध्या डोळ्यांनी दिसल्या नाहीत अशा काही गोष्टी दिसल्या का?
११. मिश्या/सोंड/नांगी/पंखांची संख्या/पायांची संख्या या आधारे वर्गीकरण करा.







## कृती ४ – वृक्ष निरीक्षण

सध्याचा काळ हा काही झाडांच्या पानगळतीचा. बघितली का मग काही अशी निष्पर्ण झालेली झाडं? त्यातही एक वेगळंच सौदर्य असतं नाही का! त्यात ते झाड बहावा, पांगारा, पळस असेल तर विचारूच नका. निष्पर्ण, पण फुलांनी डवरलेलं. आपल्या अंगणात किंवा घरासमोरच्या रस्त्यावरील एक वृक्ष निवडा व त्याची निरीक्षणे नोंदवा.

**वृक्ष निरीक्षण सूची –**

१. नाव – स्थानिक, शास्त्रीय
२. प्रकार – वृक्ष, झुडूप, वेल
३. देशी/विदेशी
४. सदाहरित/पानगळीचा
५. उंची
६. खोडाचा घेर
७. साल – स्पर्श, वास, रंग, पोत
८. पान – प्रकार – साधे की संयुक्त? आकार, रंग – वरील व खालील बाजूवरील शिरांची रचना, पर्णधारेचा आकार, पर्णाग्र आकार, पर्ण देठ आहे की नाही, पान खोडावर येण्याची रचना इ.
९. फूल – आकार, रंग, एक की गुच्छ, पाकळ्यांची संख्या, पाकळ्या एकमेकांना जोडलेल्या की स्वतंत्र, पाकळीचा आकार, निदल संख्या, निदल जोडलेली की स्वतंत्र इ.
१०. फळ – एक की घड की शेंग, रंग, आकार, फळाची आतील रचना, बियांची संख्या, मानवास खाण्यायोग्य की अयोग्य इ.
११. झाडावर पक्षी येतात का? कोणते?



## कृती ५ – निरीक्षण पारिजातकाच्या सड्याचे...

या निरीक्षणासाठी तुमच्या अंगणात / दारात पारिजातक असावा लागेल. बऱ्याचवेळा आपण प्राजक्ताच्या फुलांचा सडा पाहिलेला असतो. पण 'हा सडा नेमका कधी पडतो,' असा कधी तुम्हाला प्रश्न पडलाय का? याच प्रश्नाचं आपल्याला उत्तर शोधायचं आहे. त्यासाठी एक रात्र तुम्हाला कमी झोपावं लागेल आणि निरीक्षण करत जागावं लागेल. पण मजा येईल तुम्हाला. तुमच्या घरच्यांना चालणार असेल, तर त्यांच्या परवानगीनं आणि त्यांच्या सोबतीनं अशी एक रात्र पारिजातकाच्या सहवासात घालवणार का मग?

**निरीक्षणासाठी काही प्रश्न –**

१. फुलं किती वाजता उमलायला सुरुवात होते?
२. किती ते किती फुलं उमलत असतात?
३. फुलं किती वाजता पडायला सुरुवात होते?
४. सडा किती वेळ पडत राहतो?
५. रात्री झाडावर उमलणारी फुलं आणि पहाटे गळून पडलेली फुलं यात काही फरक जाणवतो का?
६. रात्री ८ ते ९ मध्ये उमलणाऱ्या काही फुलांना रंग लावा. पहाटे चार वाजता उठून ती फुलं किती वाजता गळून पडतात ते पाहा. म्हणजे फुलं किती तास झाडावर असतात हे समजेल.
७. झाडावरील शेवटचं फूल किती वाजता गळून पडतं हे शोधा.
८. काही फुलं घरात आणून ठेवा. ती किती तासांनी कोमेजतात ते बघा.
९. काही फुलं वाटीत थोडे पाणी घेऊन त्यात ठेवा. ती किती तास ताजी राहतात ते बघा.
१०. फुलं ३ दिवस पाण्यात ठेवा. काय परिणाम होतो ते बघा.





## कृती ६ – पावसाळी वनस्पतींची निरीक्षणे

अजून दीड दोन महिन्यात ऋतू बदलेल. पावसाळा सुरू होईल. म्हणजे पावसाळ्यातील पाऊस पडायला लागेल. मग काही दिवसांनी सगळीकडे हिरवंगार दिसायला लागेल. जिथून कहीही उगवायची शक्यता एरवी वाटणार नाही; अशाही ठिकाणी हिरवी पाती वर आलेली दिसतील. घराचे छप्पर, सिमेंटची कुंपणाची भिंत, दोन फरश्यांमधील जागा... काहीही सुटणार नाही यांच्यापासून! या वनस्पती नावानिशी ओळखणे थोडे कठीण असते. त्यासाठी त्यांना फुलं यायची वाट बघा. फुलांवरून तज्ज्ञांच्या मदतीने त्या सहजच ओळखता येतील. सुरुवातीच्या टप्प्यावर नावे नाही समजली तरी चालेल. या वनस्पतींचे वैविध्य लक्षात आले तरी खूप शिकणे होईल तुमचे. यांचे भरपूर *फोटो* काढून ठेवा. *फोटो* काढताना पूर्ण वनस्पतीचा एक *फोटो* आणि फुलांचा व पानांचा जवळून *फोटो* घ्या. त्यांची एक *पीपीटी* करून ठेवा. या वनस्पतींची अन्य जी वैशिष्ट्ये तुमच्या लक्षात येतील, तीही वहीत नोंदवून ठेवा.

**पाहा – पावसाळ्यात उगवणाऱ्या वनस्पती**



## कृती ७ – ढग निरीक्षण

तुम्ही म्हणाल हा काय विषय झाला? ढगांचं कसलं आहे निरीक्षण? तुम्हाला माहिती आहे का, की ढगांचेही प्रकार असतात? तब्बल १० प्रकार आहेत; पण सध्या इतक्या खोलात नको जायला. मे महिन्याच्या अखेरपासून तुमची नजर आकाशाला भिडवा. काय-काय बदल होताना दिसताहेत ते तुमच्या भाषेत नोंदवा. आणि ढग दिसायला लागले की, त्यांचे खालील मुद्द्यांच्या आधारे निरीक्षण करा. नोंदी ठेवा.





**ढग निरीक्षण सूची –**

| क्र. | मुद्दे | वर्णन |
|---|---|---|
| १. | **रंग** | शुभ्र पांढरा/ पांढरा/ काळपट/ गडद काळा |
| २. | **आकार** | पुंजक्यासारखा/ धाग्यांसारखा/ लाटांसारखा/ ऐरणीसारखा/ थरासारखा |
| ३. | **घनता** | दाट/विरळ/ दाट पण मध्ये फटी |
| ४. | **तापमान** | खूप-थंड/ थंड/ उबदार/ खूप गरम |
| ५. | **वारा** | जोराचा/ हलका/ जाणवत नव्हता |

ढगांचे निरीक्षणं करायला लागलात की, अजून एक गोष्ट तुमच्या लक्षात येईल-एका कागदावर आपण चित्रात ढग जसे काढतो तसे काढा. हे चित्र आणि आकाशात तुम्हाला दिसणारे ढग सारखेच आहेत का? की काही फरक आहे? विशेषत: ढगांचे तळ बघा. मग परत एकदा ढगांचे चित्र काढा. यावेळी काय फरक केला तुम्ही, हे आम्हाला नक्की सांगा.

**कुमारांसाठी ६० पेक्षा अधिक संग्राह्य पुस्तके प्रकाशित! अवश्य संग्रही ठेवा!!**



## नित्य नवा दिवस परिसर निरीक्षणाचा

**वरील सर्व कृती करत असताना खालील गोष्टी विसरू नका –**

१. एकदा आपण परिसर पाहायला लागलो की, खूप काही गोष्टी सहज दिसायला लागतील. कुणाला कोळी जाळे विणताना दिसेल, कुणाला पक्षी घरटं बांधताना दिसेल, तुमचे भाग्य असेल तर फुलपाखरू अंडी टाकतानाही दिसेल! हो, ही सगळी दृश्ये मी माझ्या अंगणात पाहिली आहेत. स्वत:ला विसरण्याचा अनुभव मिळतो या क्षणात. नक्की अनुभवा तो!!

पण भानावर आल्यावर या सगळ्या गोष्टींची नोंद करायला विसरू नका. नोंद करताना काय दिसलं, कोणत्या दिवशी, कोणत्या वेळेत दिसलं आणि जे दिसलं, त्यातील छोट्या छोट्या गोष्टी नोंदवायला विसरू नका. शक्य तिथे संख्यात्मक नोंद करा. जसं की, तुमच्या अंगणातील झाडावर पक्षी घरटं बांधत असेल, तर किती दिवसात घरटे बांधून पूर्ण झालं? त्यासाठी रोज किती तास पक्षी काम करत होते? केवळ मादी घर बांधत होती की, नर व मादी दोघेही बांधत होते? काय काय साहित्य वापरलं? अंडी टाकल्यावर पक्षी घरट्यात किती वेळ बसतो? घरटे पूर्ण झाल्यावर किती दिवसांनी अंडी घातली? पिले किती दिवसांनी बाहेर आली? इ. इ.

२. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे परिसर पाहताना जे-जे प्रश्न तुम्हाला पडतील तेही लिहून ठेवा. प्रश्नांना कोणी हसेल का? इतकेही माहीत नाही का; असं कोणी म्हणेल का? असा विचार बिलकूल करू नका. तुमचे प्रश्न म्हणजे नवीन ज्ञानाची निर्मिती असतील, हे विसरू नका.

३. आणि हो, परिसरात डोकावताना त्यातील कोणत्याही घटकाला तुमच्याकडून इजा होणार नाही असं बघा. विशिष्ट अंतरावरूनच निरीक्षणे करा.

तर मग दोस्तांनो, तुमची निरीक्षणे, तुमचे प्रश्न समजून घ्यायला आम्ही उत्सुक आहोत...

(याविषयीचे ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील मुलांनी घेतलेले अनुभव लवकरच प्रकाशित होणाऱ्या '**अन् पारिजातक हसला!**' या पुस्तकात वाचायला मिळतील **हे पुस्तक २० मे नंतर jpprakashane.org येथे विकत घेता येईल.**)

***

– **शिवराज पिंपुडे,** विभागप्रमुख, पूर्व माध्यमिक विभाग, ज्ञान प्रबोधिनी, निगडी, पुणे

**कुमारांसाठी नावीन्यपूर्ण स्पर्धा, मेळावे, कार्यशाळा यांचे आयोजन! नक्की सहभागी व्हा!!**

करून तर पाहा...

## पालक-मूग डोसे



**साहित्य :** ४ वाटी पालकाची पाने, १ वाटी सालासकट हिरव्या मुगाची डाळ, मूठभर कोथिंबीर, अर्धा इंच आलं, ७-८ हिरव्या मिरच्या, १ *टी स्पून* धनेपूड, १ *टी स्पून* जिरेपूड, १ *टी स्पून* हिंग, अर्धा *टी स्पून* दालचिनी पूड, चवीपूरतं मीठ, १ वाटी चिरलेली कांदा पात, चीज.

**कृती :** मूगडाळ किमान २ तास भिजत घालावी. भिजलेली डाळ, पालक, कोथिंबीर, मिरच्या, आलं सगळं एकत्र बारीक वाटून घ्यावं. नंतर या मिश्रणात कांदापात, चीज सोडून इतर मसाल्याचे साहित्य घालावे, मिश्रण एकजीव करावं.

आता तापलेल्या तव्यावर थोडं तेल टाकून पातळ डोसे घालावेत. एक बाजू पलटून झाली की, मग डोशावर कांदा-पात आणि चीज किसून घालावं. पौष्टिक आणि चटपटीत पालक-मूग डोसे तयार!

## मुटकुळे



**साहित्य :** १ वाटी ज्वारी पीठ, अर्धी वाटी बेसन, अर्धी वाटी मक्याचे कोवळे दाणे, १ वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, अर्धा *टी स्पून* आलं-लसूण पेस्ट, अर्धा *टी स्पून* तिखट, १ *टी स्पून* धनेपूड, १ *टी स्पून* जिरेपूड, १ *टी स्पून* पांढरे तीळ, चवीनुसार मीठ, तेल, हिंग, ओवा, ४-५ हिरव्या मिरच्या, कढीपत्ता इ.

**कृती :** तेल सोडून सर्व साहित्य एकत्र करा. त्यात २ चमचे मोहन घाला. पाणी घालून पीठ घट्ट मळा. हाताने पीठाचे मुटकुळे वळून, ते वाफवण्यासाठी कुकरच्या डब्यात वा चाळणीत रचा. ते वाफवा. वाफवल्यानंतर मुटकुळ्यांचे जाडसर काप करून घ्या. तेल, हिंग, कढीपत्ता, जिरं या फोडणीत मुटकुळे परतावे वा फोडणी त्यावर घालावी. किंवा *शॅलोफ्राय* केल्यासही छान लागतात. नंतर मुटकुळे दही/सॉस/चटणी सोबत स्वादिष्ट लागतात.

**कु. मुक्ता कुलकर्णी**, आनंद निकेतन शाळा, नाशिक
**हस्तलिखित** – मनातलं कागदावर


वार्षिक देणगीदार – • श्री. तन्मय बुडुख, सिॲटल, अमेरिका • श्री. किशोर पंडित, चेंबूर, मुंबई • असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे

# शाडू मातीचा पेनस्टँड

कलाकृती

**साहित्य –** शाडूमाती, शाडूमातीऐवजी वस्त्रगाळ केलेल्या लाल मातीचा वापर करता येईल. कापूस, पाणी, लाकडी छोटा पाट, लाकडी कोरणे, सुशोभित करण्यासाठी मणी, टिकल्या, जुन्या राख्यांचे गोंडे.







**कृती –**

१. मातीत पाणी घालून माती व्यवस्थित मळून घ्या. मातीचा गोळा झाल्यावर त्यामध्ये कापूस पिंजून मिसळा व माती चांगली मळून लाकडी पाटावर त्याचा फोटोत दाखविल्याप्रमाणे जाड दोरा तयार करावा.









२. वरील कृतीनंतर मातीचाच एक लहान चौरसाकृती पाट (स्लॅब) तयार करावा.

३. फोटोत दाखविल्याप्रमाणे वळ्यांचे दोरे फिरवून चौरसाकृती आकाराचे साधारण १०-१२ सेमी. उंचीचे भांडे तयार करावे.

४. तयार झालेली कृती थोडावेळ सुकण्याकरिता ठेवा व नंतर लाकडी कोरणेने दोन वळी जोडावर अलगद दाब द्या, त्यामुळे दोन वळ्या जोडल्या जातील.




५. फुलदाणी पूर्ण सुकल्यानंतर फोटोत दाखविल्याप्रमाणे प्रथम पांढऱ्या रंगातून बुडवून बाहेर काढून पांढरा रंग सुकू द्या व नंतर पोस्टर कलर अथवा उपलब्ध रंग वापरून सुशोभित करा. आवश्यक असेल तेथे कल्पनेने टिकल्या, राखीचे गोंडे इ. घटक वापरून नावीन्यपूर्ण सजावट करा.

६. वरील कलाकृती प्रमाणे तुम्हाला गोलाकार फुलदाणीही करता येईल.




**– संजय बुगटे**
'अरिहंत' झेंडा चौक, कन्याशाळेजवळ,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर 416143

**पाहा – विविध, कल्पक पेनस्टँड तयार करण्याच्या कृती**

(पूर्वप्रसिद्धी – छात्र प्रबोधन-सुबोध दिवाळी विशेषांक, कर्तिक, शके १९४०/२०१८)

**जरूर पाहा : स्वदेस (२००४)** – हिंदी – नासामध्ये काम करणाऱ्या एका शास्त्रज्ञाने स्वतःचा गाव सुधारण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा पट.

वार्षिक देणगीदार – • डॉ. अभय व डॉ. वीणा लिमये, पुणे • कु. राधा श्रावण हर्डीकर, पुणे

# 'सरस्वती,' तू कुठे आहेस?

कथा

– नीलिमा करमरकर

**गंगा, यमुना आणि त्यात गुप्तपणे वाहाणाऱ्या सरस्वती नदीबद्दलच्या अनेक आख्यायिका आपण पौराणिक कथांमधून वाचतो. त्या कथांमधील संदर्भ, रूपके आणि त्यांची आधुनिक संशोधनाशी बेमालूम सांगड घालून लिहिलेली कल्पनारम्य अशी उत्कंठावर्धक, काल्पनिक कथा वाचा...**

**काळ – इ. स. पूर्व ४०००, स्थान – मार्कंड ऋषींचा आश्रम, ब्रह्मावर्त**

ब्रह्मावर्तात सरस्वती आणि दृष्यद्वती नद्यांच्या काठी ऋषीमुनींचे आश्रम होते. तिथे अनेक शिष्यगण अध्ययन करण्यासाठी राहात असत. या आश्रमांना राजाश्रय मिळत असे. गवताने शाकारलेल्या अनेक पर्णकुट्यांचा समूह, सभोवार फळाफुलांची झाडे, आसपास जंगलांचा प्रदेश आणि जवळून वाहणारी जीवनदायिनी नदी असे दृश्य असे. परंतु गेली दोन-तीन वर्षे निसर्ग जणू रागावला होता. बारमाही वाहणाऱ्या सरस्वतीचा प्रवाह अगदी क्षीण झाला होता. पर्जन्यमान म्हणावे तसे नव्हते. त्यामुळे यमुना नदीचे पाणी सरस्वतीपर्यंत येऊन पोहोचत नव्हते.

वैदिक काळात नद्यांच्या काठी संस्कृतींचा उगम झाल्याने आसपासच्या प्रदेशातील लोक नद्यांना देवीस्वरूप मानत असत. सरस्वतीपूजन करताना ती सर्जनाची, ज्ञानाची, कलेची तसेच वाक्देवता असल्याचे मानले जाई. तिचा जन्म हिमालयाच्या शिवालिक टेकड्यांमध्ये झाला होता. तिथून ती खाली आदीबद्रीपर्यंत उतरून त्यानंतर मैदानी प्रदेशात येत असे. हल्लीचे हरियाणा, राजस्थान, गुजराथ असा १६०० कि.मी.चा प्रवास करून ती अरबी समुद्राला मिळायची.

त्याकाळच्या परंपरेनुसार मार्तंड ऋषी आणि त्यांचे सहकारी ऋषिगण यांनी एकत्र विचारविनिमय करून नदीला प्रसन्न करून घेण्यासाठी यज्ञ करण्याचे ठरवले. यज्ञाची जोरदार तयारी सुरू झाली. सर्वजण उत्साहात होते. अखेर तो शुभदिवस उजाडला. ब्राह्ममुहूर्तावर आश्रम परिसरात मंत्रांच्या उद्घोषाने वातावरण दुमदुमून गेले.

जवळच्या गावातले स्त्री-पुरुष दर्शनासाठी आले होते. यज्ञाचे पावित्र्य व प्रसन्नता वातावरणात भरून राहिली होती. समाप्तीचे वेळी सर्व नद्यांना आवाहन करून ऋग्वेदातील नदीसूक्ताचे पठण सुरू झाले.

'हे सरस्वती, तू उत्तम माता, उत्तम नदी, देवीतुल्य अशी आहेस. आमच्यावर तुझी कृपादृष्टी असू दे,' असे यजमान मार्तंडऋषींनी आवाहन केले आणि एकदम चमत्कार झाला. आकाशात गडगडाट होऊन विजा चमकू लागल्या. अंधार झाला आणि धगधगत्या अग्निकुंडाच्या ज्वालांमधून एक सुंदर युवती प्रकटली. तिचे निर्मळ हास्य, तिचे वस्त्रालंकार आणि आयुधे बघून सर्वांचे



कटू असो वा गोड असू दे, स्नेहभराने सांभाळावे। उंच करावे बाहू इतके, सर्व जगाला कवटाळावे।।



वार्षिक देणगीदार – • डॉ. जयेश राहाळकर, पुणे • श्री. सुभाष माळी, पुणे



डोळे दीपले. तिच्यामध्ये राजस अशी सात्विकता होती. सर्वजण आनंदले, तिला सन्मानाने आसन देण्यात आले. लवकरच ती युवती आश्रमाच्या वातावरणात रुळून गेली. साधेपणाने राहून ती इतर ऋषिकन्यांप्रमाणे आश्रमातील कामे करत असे.

एकदा ती नदीवर पाणी भरण्यास गेली होती, त्यावेळी जंगलातून येताना तिच्या मार्गात एक बिबट्या आडवा आला. भयाने तिच्या हातातील पाण्याचा घडा पडून फुटला. तिची किंकाळी ऐकून जवळच लाकडे तोडत असलेला मार्तंडऋषींचा मुलगा आनंदवर्धन धावत आला. बिबट्या आवाजाने घाबरून पळून गेला होता. त्याच्या हातातली कुऱ्हाड शिवशिवत होती. ती युवती ऋषिकुमाराचे आभार मानू लागली; पण त्याचे तिच्या बोलण्याकडे लक्षच नव्हते. तो तिच्या सौंदर्यावर लुब्ध झाला होता. उत्तरोत्तर दोघांचा परिचय वाढत जाऊन त्याचे प्रेमात रूपांतर झाले. आनंदवर्धन हा उत्तम शिल्पकार होता. त्याने तिची मूर्ती घडवण्याचे ठरवले. त्यासंबंधी तिला विनंती केल्यावर तिने होकार दिला.

दुसऱ्या दिवशी प्रात:काळी दोघेजण उपवनात भेटले. तिला एका खडकावर बसवून आनंदवर्धन तिची मूर्ती घडविण्याची तयारी करू लागला. नेमके मार्तंड ऋषी त्यादिवशी त्याच उपवनातून नदीवर स्नानास जाताना त्यांनी दोघांना बघितले आणि त्यांचा

**जरूर पाहा : स्टॅनले का डिब्बा (२०११)** – हिंदी – डबा न आणणाऱ्या स्टॅनलीची हृदयस्पर्शी कथा.

**वार्षिक देणगीदार – • डॉ. विनायक देसूरकर, पुणे • कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे • श्री. अनंत बेडेकर, वाई, जि. सातारा**

क्रोध अनावर झाला. अतिशय क्रुद्ध होऊन शाप देण्यासाठी त्यांनी हात उंचावला आणि आक्रीत घडले...

एकाएकी ढगांचा गडगडाट होऊन भूमी थरथरू लागली. अवघे भूमंडळ डळमळीत झाले. महाकाय वृक्ष उन्मळू लागले. सर्वजण सैरावैरा धावू लागले. भूमीला प्रचंड मोठी भेग पडली अन् त्या युवतीने चटकन आनंदवर्धनचा हात पकडला आणि उभयतांनी घळईप्रमाणे भासणाऱ्या महाकाय भेगेत उडी घेऊन, ते अंतर्धान पावले. त्यानंतर कधीच ते कोणालाही दिसले नाहीत. काही लोकांच्या म्हणण्याप्रमाणे जमिनीखाली एक मोठा बोगदा तयार झाला होता. त्यातून ते पुढे गेले असावेत. तो बोगदा छोट्या गुहेच्या स्वरूपात अजूनही आहे.

***

**काळ – इ. स. २०१८,**

**स्थान – डेक्कन कॉलेज, पुणे**

डेक्कन कॉलेजमध्ये एक महत्त्वपूर्ण *मिटींग* सुरू होती. कॉलेजचे प्राचार्य डॉ. ढवळे उपस्थित पुरातत्त्व शास्त्रज्ञांना भारत सरकारकडून आलेला महत्त्वपूर्ण खलिता वाचून दाखवत होते. या संस्थेचा पुरातत्वशास्त्र विभाग देशभरच नव्हे, तर जगात प्रसिद्ध होता. सदर पत्र हे इ. स. २०१५ मध्ये स्थापन झालेल्या *'सरस्वती हेरीटेज डेव्हलपमेंट बोर्ड'* (SHDB) कडून आलेले होते. त्यामध्ये गुजराथ, राजस्थान, हरियाणा या राज्यांमध्ये यापूर्वी काही प्रमाणात झालेल्या उत्खननाचा संदर्भ होता. आत्ताच्या शासनाला सरस्वती नदीचा मार्ग आणि ती लुप्त होण्याचे कारण यासंबंधी शोध घ्यायचा होता. उपस्थितांमध्ये डॉ. स्वानंद भावे या तरुण शास्त्रज्ञांचा समावेश होता.

डॉ. स्वानंद भावे यांनी विचारले, ''यापूर्वी इ. स. २००० च्या सुमारास डेक्कन कॉलेजची एक *टीम* उत्खननासाठी कच्छमध्ये गेली होती. त्यांनी केलेले काम वा त्याचे काही निष्कर्ष सांगता येतील का?'' त्यावेळी उपस्थित डॉ. शिंदे यांनी सांगितले की, ''इ. स. २००० साली आपली टीम 'कालीबंगा', 'ढोलावीरा' इथे गेली होती. उत्खननात सिंधु संस्कृतीचे हडप्पा इथे मिळालेल्या अवशेषांशी येथे मिळालेल्या अनेक वस्तूंचे साधर्म्य होते. उदा. फुटकी मातीची भांडी, औजारे, विटांच्या भिंती, मूर्तींचे तुटके भाग वगैरे. परंतु या सगळ्या पसाऱ्यात आम्हाला एका मातीच्या ढिगाखाली अतिशय सुबक अशी देवीची मूर्ती सापडली. आश्चर्य म्हणजे ती अगदी जशीच्या तशी होती.''

डॉ. स्वानंद भावेंनी विचारले, ''तुम्ही ती मूर्ती व इतर वस्तू बरोबर का आणल्या नाहीत?''

त्यावर डॉ. शिंदे म्हणाले, ''इ. स. २००१ मध्ये कच्छमध्ये भूज इथे मोठा भूकंप झाला. आमचे सर्व काम झालेल्या पडझडीमुळे तसेच टाकून आम्ही तात्काळ पुण्याला आलो. या कामासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान बंद झाले. सर्व सरकारी निधी पीडित जनतेच्या पुनर्वसनाकडे वळवण्यात आला.''

प्राचार्य ढवळे म्हणाले, ''आता हे काम पुन्हा सुरू करायचे आहे.''

त्यांनी सरस्वती उत्खनन संदर्भात डॉ. प्रसाद, रोमिला थापर, मुखर्जी यांनी दिलेले संदर्भ स्पष्ट केले. ते म्हणाले, 'नासा'ने केलेल्या चित्रीकरणातून दिसते की, जे घग्गर-हाक्रा या नदीचे पात्र आहे, तेथूनच सरस्वती त्या काळात वाहात होती. परंतु Tectonic

श्वासांमध्ये भिनवा वारे, आकाशातील वेचा तारे। पराक्रमांचे उंच मनोरे, आकाशाला भिडू द्या रे।।



वार्षिक देणगीदार – • सौ. उषा पुरंदरे, पुणे • एक हितचिंतक, पुणे
• श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

Disturbance म्हणजे काही कारणाने भूखंड एकमेकांपासून अलग होऊन ही नदी वाळवंटात लुप्त झाली. तिचे पाणी ऋतुमानानुसार कमी जास्त होई. परंतु आज ती जमिनीखालून वाहात जाते, याचे स्पष्ट पुरावे उपलब्ध नाहीत.''

डॉ. ढवळे यांनी या मोहिमेची सर्व सूत्रे डॉ. स्वानंद भावेंकडे सोपवली आणि या योजनेची तयारी सुरू झाली. डॉ. शिंदे यांनी देवीच्या सुबक मूर्तीचा शोध अवश्य घेण्यास सांगितले.

***

**काळ – इ. स. २०१८, स्थान – ढोलावीरा, गुजराथ**

डॉ. भावे आणि सहकारी कच्छच्या रणात पोहोचले. त्यावेळी तिथे गुजरात सरकारचा *'रण फेस्टिव्हल'* सुरू होता. सर्व वाळवंट थंडीत मिठामुळे पांढरेशुभ्र होते. ते बघायला जत्रेसारखी गर्दी होती. रात्रभर लोकसंगीत, भवाई नाटके याची धूम होती. सर्व कहाण्यांची नायिका 'सरस्वती नदी' होती राजा रविवर्मा यांनी चितारलेल्या चित्रात बघितलेली देवी अशीच तर असते. काही बुजुर्ग मंडळींच्या सरस्वतीबद्दलच्या आख्यायिका ऐकून, दुसऱ्या दिवशी पहाटे पुणेकर शास्त्रज्ञ 'ढोलावीरा'कडे रवाना झाले. प्रवास खडतर होता. *साइटवर* पोहोचताच तंबू, राहुट्या ठोकून कामाला सुरुवात झाली.

सर्वेक्षण करण्यासाठी आपले पुणेकर होते. प्रत्यक्ष खोदकामासाठी स्थानिक कामगार नेमले गेले. दुसऱ्या दिवसापासूनच काम सुरू झाले. अनेक मातीच्या वस्तू, मणी, भांडी, घरांचे अवशेष मिळत होते. जनावरांची हाडे व मानवी सांगाडे मिळाले. ते काळजीपूर्वक साफ करून *'रेडिओकार्बन डेटींग'* पद्धतीचा अवलंब करून त्याचा अंदाजे कालखंड शोधण्यात आला. तो सिंधू संस्कृतीचे हडाप्पा इथे जे अवशेष मिळाले, त्याच्याशी जुळणारा होता. म्हणजे सिंधू संस्कृतीची एक शाखाच सरस्वती नदीकाठी बहरली होती.

काम मागण्यासाठी रोज जवळच्या गावातले लोक येत. एक दिवस बायकांचा एक तांडा आला. सगळ्या रंगीबेरंगी घागरा ओढणी घातलेल्या, त्यावर कच्छी कशिदाकाम, हातभर बांगड्या, गळ्यात माळा अशा, अर्धवट हिंदी, गुजराथी बोलत होत्या. मातीची घमेली वाहून नेण्यासाठी त्यांना नेमले, त्यांच्यामुळे या रूक्ष *'साइट'वर* कलकलाट वाढला; पण 'जान'आली हे निश्चित! या बायकांची 'म्होरकी' एक तरुण मुलगी होती. काही तक्रार, मागणी असेल तर ती 'बडे बाबू' म्हणजे डॉ. स्वानंद यांच्याकडे बेधडक येई. बोलताना चेहऱ्यावर घुंघट ओढून घेत असे.

एक दिवस या बायकांनी हक्काने सुट्टी मागून घेतली, तेव्हा स्वानंदला कळले की, आज होळीचा सण आहे. सर्व बायकांनी फेर धरला, रंग उधळला, पुरुषही सामील झाले व सर्वांनी आग्रहाने स्वानंद सरांना ओढून घेतले. हे सगळे करण्यात पुढाकार तरुण *लीडर* असलेल्या 'सरू'चा होता. नाचताना तिचा चेहरा स्वानंदला जवळून दिसला व ते ग्रामीण सौंदर्य बघून तो अवाक् झाला. नृत्याची लय वाढली, गाणे अर्थातच 'सरस्वती नदी'चे होते. शेकडो वर्षे स्थानिकांच्या मनात ती स्थान टिकवून होती.

त्या दिवसापासून स्वानंद आणि सरूची ओळख वाढत गेली. बोलण्यावागण्यात धीटपणा, मोकळेपणा आला. दोघं एकमेकांना आवडू लागले. बायका त्यावरून तिची थट्टाही

**जरूर पाहा :** उरी (२०१९) – हिंदी – उरी या गावात भारताने केलेल्या सर्जिकल स्ट्राईकवर आधारित थरारक युद्धपट.


वार्षिक देणगीदार – • डॉ. वर्षा बखले, चेंबूर, मुंबई • सौ. स्मिता चावरे, नवी मुंबई

करू लागल्या. स्वानंदला पण ती मनापासून आवडली. एका सुट्टीच्या दिवशी त्याने तिचे 'रफ स्केच' सुद्धा काढले. ती सांगत असलेली जुनी संदर्भ माहिती या उत्खननात उपयोगी पडे. अनेक जागा तिने अचूक दाखवल्या. पौराणिक कथांचा तिच्याजवळ खजिनाच होता.

मधूनमधून पुण्याहून डॉ. शिंदे कामासंबंधी पत्रे पाठवत, त्यात 'देवीची मूर्ती सापडली का?' असा उल्लेख असे.

'सरू'जवळ गप्पा मारताना एकदा स्वानंदने हा विषय काढला आणि 'सरस्वतीची मूर्ती कुठे दिसली का,' वगैरे चौकशी केली. हे ऐकताच तिच्या चेहऱ्यावरचे भाव एकदम बदलले व ती जरा घाबरली. पण रोज तोच तोच विषय काढून स्वानंदने आपला हेका सोडला नाही. सरू म्हणाली, ''मला माहिती आहे ती मूर्ती! मी बघितलेली आहे; पण तिचे स्थान म्हणजे बराच लांबचा पल्ला आहे. आपल्याला दूरवर चालत जावं लागेल.''

स्वानंदने तयारी दर्शवली. सोमवती अमावस्येची रात्र होती. सर्व राहुट्यातून निजानीज झाल्यावर दोघंजण काळोख्या रात्री निघाले.



जवळजवळ दीड-दोन किलोमीटर मातीतून, वाळूतून, गेल्यावर सरू थांबली आणि म्हणाली, ''या पुढे जपून चला. खूप काळोख आहे. ओलसर वाळू, माती असल्याने पाय घसरेल.''

सरूच्या हातातला कंदील हेलकावत होता. एका वाळूच्या टेकाडात गुहेसारखा भाग होता. तिथून दोघेजण आत शिरले. स्वानंद म्हणाला, ''ही जागा तुझ्या ओळखीची आहे का? अगदी सराईतासारखी पुढे चालली आहेस.''

सरू म्हणाली, ''मी नेहमीच इथे येते.'' हे ऐकून स्वानंद जरासा घाबरला. पण त्याने तिचा हात घट्ट धरून ठेवला. आता तिचाच फक्त आधार होता.

उन्हाळ्याच्या कडाक्यात आत मात्र थंडगार होतं. गुहा म्हणावी तर पुढे लांबलचक

नवे मित्र एकमेकां भेटवीत जाऊ। नव्या उन्मेषांचे क्षण साठवीत जाऊ।।



वार्षिक देणगीदार – • श्री. अजय घाणेकर, पुणे • श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे

बोगदाच सुरू झाला. पाण्याचे ओघळ सर्वत्र वाहात होते. नि:शब्दपणे दोघेजण कितीवेळ चालत होते देवालाच ठाऊक! बहुदा पूर्ण रात्र चालण्यातच गेली आणि आता स्वानंदला काही कळेनासे झाले, शुद्ध हरपत आहे याची जाणीव झाली आणि पुढे...?

***

**काळ – एप्रिल २०१८, गुढीपाडवा, चैत्र शुद्ध प्रतिपदा, स्थान – अलाहाबाद**

स्वानंदला प्रात:काळी शुद्ध आली आणि आपण कुठे आहोत हेच कळेना. त्याचे कपडे ओलसर होते आणि तो नदीकाठी होता. आजूबाजूला सर्व लोक नदीवर स्नानासाठी जात होते. काठावर मंदिरांची, साधुसंन्याशांची गर्दी होती. एका टपरीवर लिहिलेले 'प्रयागराज' हे नाव त्याने वाचले. 'बाप रे! मी इतक्या लांब हजारो कि. मी. प्रवास करून आलो? इथे तर गंगा, यमुना, अदृश्य सरस्वतीचा संगम आहे.' त्याला रात्रीची घटना अंधूकशी आठवली व तो सरूऽऽ अशा हाका मारू लागला. इतक्यात त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. तो जिथे पडला होता, तिथे शेजारीच वाळूत कापडात गुंडाळलेली मूर्ती होती.

त्याने कापड बाजूला सारून बघितले तर काय, साक्षात सरूच आपल्यासमोर आहे, असे त्याला वाटले. तीच चेहऱ्याची ठेवण, तेच चेहऱ्यावरचे भाव! त्याला काही सुचेनासे झाले. मूर्तीजवळ कागदाचा चिटोरा होता आणि त्यावर देवनागरीत 'सरू' अशी अक्षरे होती. म्हणजे आपल्याला साक्षात सरस्वती नदी भेटली की काय? मार्तंड ऋषींच्या आश्रमातून अंतर्धान पावलेली! आणि मग आनंदवर्धन? डोकं शांत ठेवून स्वानंदने खिसे चाचपले. सुदैवाने पैसे, डेबिट कार्ड सर्व शाबूत होतं. मूर्ती अलगद उचलून त्याने कवेत घेतली. आता त्याला अतर्क्य गोष्टींचा हळूहळू उलगडा होऊ लागला होता. एक अनोखा अनुभव त्याने घेतला होता. चेहऱ्यावरचे भीती, आश्चर्य हे सर्व भाव पालटून आता आनंदाचे 'वर्धन' होत होते. स्वानंदची पाऊले रेल्वे स्टेशनच्या दिशेने पडत होती. 'ढोलावीरा' येथे जाणारी गाडी त्याला पकडायची होती. तिथे त्याला त्याची 'सरू' म्हणजेच सरस्वती भेटणार होती का?

✤✤

**– नीलिमा करमरकर**
५०१, 'रेनेसान्स, डॉ. केतकर मार्ग, प्रभात रस्ता, पुणे – ४

**ऐका – कथा**
**'भ्रमंतीची भ्रमणगाथा'**
**लेखिका व वाचनस्वर**
**वाच. नलिनी गुजराथी**

## बालकुमार मासिकांमधील साहित्याची झलक

सौर चैत्र महिन्यापासून बालकुमार वयोगटासाठी प्रकाशित होणाऱ्या अधिकाधिक नियतकालिकांचे मागील महिन्यातील मुखपृष्ठ, अंतरंग व त्याचबरोबर एक लेख सोबतच्या QR कोडद्वारे वाचता येईल. त्याची सूची खालीलप्रमाणे –

**एप्रिल २०२१ च्या मासिकांमधील लेख**

| | |
|---|---|
| १. **निर्मळ रानवारा** | : थोरांची आई (विश्वनाथन आनंद)– संजयकुमार चौधरी |
| २. **मुलांचे मासिक** | : चतुर सुनबाई – मृणालिनी केळकर |
| ३. **छात्र प्रबोधन** | : वसंत सौंदर्यसडा! – डॉ. कांचनगंगा गंधे |
| ४. **किशोर** | : बानाने सांगितलेली मेळघाटची गोष्ट –पियुषा जगताप |
| ५. **ऋग्वेद** | : गाढ झोपेला जाग आली – विक्रम वागरे |
| ६. **वयम** | : मी पी बोलतोय – श्रीराम शिधये |

**जरूर पाहा : इकबाल (२००५)** – हिंदी – एका मूकबधिर मुलाची प्रेरणादायी कहाणी.

**वार्षिक देणगीदार –** • **श्री. मयुरेश सोहोनी, पुणे** • **एक हितचिंतक, दिल्ली**

# अंधारात पडलेला प्रकाश



तेव्हा संध्याकाळचे ७.३० वाजले होते. मी खेळून आले होते. आणि ३ मजले पायऱ्या चढून घराची *डोअरबेल* अधिरतेने वाजवली. आईने दार उघडले. उघडल्या उघडल्या, ''आधी हात *सॅनिटाईज* कर, आणि मग फिरत बस घरभर!'' अशी सूचना कानावर पडली. मीही सूचनेच्या शब्दांवर चालत हात *सॅनिटाईज* केले. हात-पाय, तोंड धुतले कपडे बदलले व संगणक लावणार तोच अचानकच घरातले *लाईट* गेले. मी कासावीस झाले. डोळ्यासमोर अचानक अंधार पडलेला मला मुळीच आवडला नव्हता. मी घरात जरा मोठ्याने म्हटलं, ''काय हेऽऽऽ... या लाईटला आत्ताच जायचं होतं का?'' मी आता कुठे अभ्यासाला बसणार होते, की या *लाईटने* बरोबर डाव साधला!''

असेच काही बरळत मी माझ्या खोलीच्या खिडकीपाशी येऊन बसले. नकळतच माझी नजर बाहेरच्या दृश्यावर गेली. सगळीकडे अंधार, आणि बाहेर नुसता गाड्यांचा आवाज! त्या अंधारात *मोबाइलचे टॉर्चलाईटही* खिडक्यांमधून चमकताना दिसले. खालीच एक काका वैतागून *वॉचमनकाकांना* विचारत होते, *''ये लाईट हर एक महिने में क्यो जाती है? हमको कितना प्रॉब्लेम होता है!''* हे ऐकून आपल्याला *लाईट* गेल्यावर राग येण्यात काही चुकीचं नाही, याची मला खात्रीच पटली. तेवढ्यातच माझी नजर घराशेजारच्या लक्ष्मीच्या झोपडीपाशी गेली.



लक्ष्मीला आईवडील नाहीत, म्हणून ती तिच्या आजीसोबत राहते. तिची आजी कचरा वेचण्याचं काम करते. लक्ष्मीही चार घरची धुणी-भांडी करून आजीला महिन्याचा रोजगार भागवायला मदत करते. लक्ष्मी खूप हुशार, मेहनती मुलगी होती. तिला चित्रकलेचीही फार आवड होती. फावल्या वेळात कायम ती चित्रकलेत गुंगून जाताना मी तिला बघत होते. तिच्या घरात अंधार होता. फक्त तो देवापुढचा दिवा मंद, झळाळता; पण तेजोमय प्रकाश देत होता. त्यापुढे बसून लक्ष्मी अभ्यास करत होती. तेवढ्यात तिच्या आजीने तिला देवाला नमस्कार करायला सांगितलं. तिनं जसं सांगितलं तसं केलं व परत अभ्यासाकडे आपला मोर्चा वळवला.

तिची ही कृती मला खूप काही शिकवून गेली. 'सगळं असतानाही उगाचच तक्रारी न करता, आहे त्या साहित्याचं सोनं करणं,' हे मला तिनं काहीही न बोलताच शिकवलं होतं.

तेवढ्यात *लाईट* परत आले. सगळा अंधार उजेडानं परत व्यापून घेतला. अचानकच मला जाणवलं, की *लाईट* १० मिनिटं नव्हते! पण, या दहा मिनिटांत माझ्या डोक्यातल्या अंधारात चांगलाच प्रकाश पडला होता!

**– कु. विशाखा मठे** (इ. १० बी)
vishakhamathe@gmail.com

स्वप्न फुलविण्या भवितव्याचे, जिद्द अंतरी जागवूया। कर्तृत्वाने उन्नत होऊन, जीवन आपुले फुलवूया।।



वार्षिक देणगीदार – • श्री. अनिल रिसबूड, पुणे • श्री. संतोष साटम, पुणे





माहितीपर

# नवचैतन्याची नवी पालवी!

– डॉ. कांचनगंगा गंधे

शिशिर संपला. ऋतू बदलायला लागला. शरदातली थंडी जवळजवळ नाहीशी झाली होती. दिवसा, मध्यान्हीला उन्हं तापायला लागली. दवबिंदूंशी सलगी असलेल्या हिरव्या पानांचा रंग बदलायला लागला. पानं पिवळी, तांबडी-राखट, निस्तेज दिसायला लागली, ती झाडापासून अलग व्हायला लागली. पानझडीचे दिवस सुरू झाले आणि फाल्गुन संपेतोपर्यंत पानगळी वृक्षांची सर्व पानं गळून वृक्षयष्ट्या उघड्या पडल्या. काही कमनीय, काही बेढब, काही वाळलेल्या काटक्यांसारख्या तर काही खराट्यासारख्या! सगळीकडे भकास वाटायला लागलं. सारी सृष्टी म्लान झाली. ऋतुबदल झाला.

चैत्राचं आगमन झालं! निरोप घेतल्याशिवाय नव्याचं आगमन होत नाही. निसर्गातला हा नियम सगळ्याच वृक्षांना माहीत असावा, म्हणूनच पानगळ झाली असावी. नव्याच्या आगमनाची सर्वच आतुरतेनं वाट पाहात होते. खरंतर, त्याची सुरुवात वृक्षांनी शिशिरातच केली होती. पानगळ होण्याअगोदर खोडात, फांद्यात त्याची तयारी झाली होती. ठरावीक ठिकाणी थोडी थोडी रसायनं गोळा झाली होती. त्यातून काहीतरी 'नवीन' बाहेर येणार होतं! निसर्गात बदल झाले. उन्हं जास्तच तापली, वसंतोत्सव – चैत्रोत्सव सुरू झाला. पक्षिगण आनंदानं गाऊ लागले. ते गायन ऐकण्यासाठी की काय, वृक्षांच्या खोडातून नवचैतन्याचे झरे वाहायला लागले.

एकदम नाजूक नवजात अर्भकाच्या कांतीसारखी सतेज, मऊ, लुसलुशीत पोपटी-लालसर पालवीच्या कळ्या झाडाच्या खोडातून रोमांच उभे राहावेत, तशा बाहेर यायला लागल्या. प्रत्येक वृक्षाची 'पालवी कळ्या' बाहेर पडण्याची रीत निराळी, प्रत्येकाची नजाकत वेगळी; पण बघत बसावंसं वाटणारी, डोळे तृप्त करणारी ती नजाकत! आग ओकणाऱ्या सूर्य किरणांनाही सळसळत्या चैतन्यानं, धैर्यानं तोंड देणारे नव पल्लव उमलून यायला लागले.

वसंत नखशिखान्त फुलला होता, रंग-गंधाचं सर्वत्र साम्राज्य होतं. पण नव चैतन्याची नवी पालवी यायला लागल्यावर त्यांचं महत्त्व कमी व्हायला लागलं! साऱ्या सृष्टीचं लक्ष आता नव्या पालवीकडे लागलं होतं: चैत्रगौरीचं स्वागत करायला पोपटी 'पताका' बाहेर यायला लागल्या. रानावनात तर उत्साहाचं भरतं आलं

**जरूर पाहा : द पियानिस्ट (२००२)** – इंग्रजी – एका कलावंत मनाच्या नायकाचा जगण्यासाठीचा झगडा.

वार्षिक देणगीदार – • श्री. शरद पालकर, पुणे • कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे

होतं! नखशिखान्त फुललेल्या पिवळ्याजर्द फुलांच्या 'गणेरी'चं सौंदर्य कमी व्हायला लागलं, पण पोपटी, मऊ पालवी खोडातून बाहेर यायला लागली. पिवळ्या टपोऱ्या फुलांच्या मधेमधे खोडावर पोपटी ठिपक्यांची रांगोळी दिसायला लागली. पिवळ्या, पोपटी रंगांचं मिश्रण अप्रतिमच होतं! 'धामण' वृक्षाची फुलं, पिवळ्या रंगाची, पण पालवी नाजूक – जाईसारखी दोघांनी एकत्रच चैत्राचं स्वागत करायचं ठरवलं!

वृक्षांवरच्या पालवी फुटण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या; पण खूप मनोहर, सुंदर, साऱ्यांना खुणावणाऱ्या! पालवी फुलतानाचं खरं सौंदर्य पाहावं ते 'पिंपळावर'! मोठी पानं चैत्रातच गळतात! पानगळ झाली आहे, असं वाटेपर्यंत वैशाखात सारा वृक्ष पानकळ्यांनी भरून जातो. कुणीतरी आखीव-रेखीव रांगोळी काढल्यासारखी! त्यांचं दिसणं खूपच मोहक! पानकळ्या ताठ उभ्या राहतात. आत चवदार, तांबूस, पोपटी पालवी दडलेली! आतला 'स्वाद' आपणच प्रथम अनुभवायचा म्हणून पोपटासारखे पक्षी 'पानकळ्यांवर' तुटून पडतात.



बदाम

पानकळ्यांवरचं कवच/ आवरण गळून पडतं- एखाद्या गुंडाळलेल्या दोरीसारखं! गुलाबी-तांबूस पोपटी झाक असलेल्या कोवळ्या पताकांनी 'पिंपळ' भरून जातो. वाऱ्याच्या छोट्या झुळकीनं या पालवीचं नाजूक सळसळणं सुंदर भासतं! सकाळ-संध्याकाळच्या कोवळ्या उन्हात हा 'सोनियाचा पिंपळू' नवचैतन्याचे फवारे उडवत असल्याचा भास होतो.

खोट्या बदामाचा एरवी डौलदार, दिमाखदार दिसणारा वृक्ष, पानगळीमुळे खोट्या



नागचाफा

बदामाची एकदमच रया गेलेली! खोट्या बदामाच्या जाडजूड फांद्या जणू हात पसरून काहीतरी मागत असल्यासारख्या! निसर्गानं त्यांच्या हातावर पानकळ्यांच्या 'पणत्या' ठेवलेल्या! ठरावीक अंतरावर छोट्या पानांचे गुच्छ ओळीनं मांडल्यासारखे! गुच्छ उमलायला लागले की, हिरव्या रंगाच्या पणत्या तेवत असल्यासारखं दिसतं!

सीताफळाच्या पालवीची तीच तऱ्हा, फक्त त्यांच्या 'पणत्या' फार नाजूक आणि छोट्या! 'वावळा' वृक्षाची पानं कधी गळतात, नवीन हिरवी फुलं कधी येतात, त्यांची पोपटी, नाजूक, चपटी फळं कधी येतात, हे तर कळतच नाही. दूरून बघितलं तर चपटी फळं 'पालवी' तर नाही ना, इतकी नाजूक आणि चैतन्य देणारी! फळं तपकिरी व्हायला लागली की, झाडावर कोवळी, पोपटी, चकचकीत पालवी केव्हा येते, तेही लक्षात येत नाही.

सदाहरित जंगलातही वृक्षांवरच्या फांद्यातून नव्या पालवीचे सूर उमटत होतेच! नागचाफ्याच्या पालवीनं तांबूस रंगाबरोबर चंदेरी चकाकत्या

रंगाची साथ घेतली होती, त्यामुळे 'सदाहरित' असूनही त्या चकाकणाऱ्या सौंदर्याची वेगळीच छाप जंगलात उमटली होती. 'सीता अशोकानं' सुद्धा याला साथ दिली. फांद्यांच्या टोकातून तांबूस रंगाचं नाजूक 'केळफूल' लटकावं तशी त्याची पालवी लटकत होती. त्या पालवीचं चकाकणं आणि लटकणं पाहात असताना चकाकणाऱ्या दिव्यांची आठवण होत होती. 'पानाचा अशोक' मात्र हिरव्या रंगाची साथ सोडायला तयार नव्हता! जुनी पानं पिवळी होऊन पडायच्या अगोदरच चकाकणारी, सळसळती पालवी झाडाच्या उंच डोलकाठीवर लटकायला लागली! पालवीही हिरवी अन् फुलंही हिरवी एकमेकात मिसळून गेलेली!

आंब्याच्या मोहोरावर छोट्या हिरव्या लोलकासारखी फळं लटकायला लागली की, डहाळ्यांवरच्या टोकांवर तांबूस, गुलबट, मऊ, लुसलुशीत, वासुदेवाच्या टोपीसारखी पालवी खूपच अप्रतिम! रानावनातल्या 'पांढऱ्या धूप' सदाहरित वृक्षाच्या पालवीनं 'तांबं' प्यायलं आहे की काय, असं वाटतं!

'साल' वृक्षाची, 'दालचिनी'



दालचिनी वृक्ष

वृक्षाची तांबडी कोवळी पालवी आणि त्या पालवीवरच्या पिवळसर पांढऱ्या रेषांचं जाळं बघितलं की, निसर्गाची किमया किती अगाध आहे, याचं प्रत्यंतर येतं! 'मोहा'च्या वृक्षावरच्या डहाळ्यांवरची पालवी येते तेव्हा छोट्या छत्र्या उघडल्यात असं वाटतं!

'महागनी' महाकाय वृक्षावर जेव्हा पालवी येते तेव्हा खोडावर पोपटी नक्षी काढल्यासारखी दिसते. सलई, काटेसावर, कुंभा,



आंब्याचा मोहोर

कहांडोळ, कळम, आसाना, तिवस, टेटू, बिब्बा अशा अनेक निष्पर्ण वृक्षांवर नवचैतन्याची नवी पालवी उमलते, ती पुढे वैशाखात येणाऱ्या सूर्यप्रकाशाच्या दाहकतेपासून झाडांचं रक्षण करण्यासाठीच! सर्वच पानझडीच्या आणि काही प्रमाणात सदाहरित वृक्षांवरच्या पालवीचं जगात अवतरणं म्हणजे एखाद्या तेजस्वी तपस्व्यानं सृष्टीचं सौंदर्य वाढवण्यासाठी, प्राणिमात्रांना, पक्ष्यांना दिलासा देण्यासाठी घेतलेला जन्म!

पालवीच्या रूपात जन्म घेऊन पानगळीपर्यंतचं जीवन म्हणजे तपस्व्यानं केलेली साधना, त्याचा जीवनक्रम! कोवळ्या पालवीतली मार्दवता, स्वत:तला तेजरस आणि सूर्यातल्या शक्तीचा उपयोग करून स्वत:च्या आणि इतरांच्या अस्तित्वासाठीची केलेली धडपड होय!

– डॉ. कांचनगंगा गंधे
४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे 411030

वाचा
**वैशाख वणवा**
लेखिका – डॉ. कांचनगंगा गंधे

**जरूर पाहा : वोलकॅनो (१९९७)** – इंग्रजी – पॅरिस शहरात झालेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकाची चित्तथरारक कहाणी.

वार्षिक देणगीदार – • श्री. शशांक चांदोरकर, पुणे • श्री. चैतन्य वझे, डोंबिवली

# ताकास तूर लागू न देणे

ताकास तूर लागू न देणे याचा प्रचलित अर्थ 'थांगपत्ता न लागू देणे' असा आहे. साहजिकच तूर या धान्याचा यात काही संबंध आहे का असा प्रश्न पडतो.

गंमत अशी आहे की ताकास तूर यातील शब्द ताक असा नसून ताका आहे आणि ताका म्हणजे तागा. तागाचा अर्थ (१) नव्या / अखंड कापडाचा गठ्ठा किंवा (२) (विणकराच्या) मागावरील न फाडलेले (कापडाचे ) ठाण असाही अर्थ सापडतो. थोडक्यात, ताका/तागा म्हणजे मागावरील संबंध न फाडलेले कापड किंवा दोरा, धागा. आता तूर म्हणजे द्विदल धान्य हे आपल्याला माहीत आहे. परंतु या शब्दाचा दुसरा अर्थ म्हणजे विणलेले वस्त्र ज्या लाकडाभोवती गुंडाळले जाते ते लाकूड, कोष्ट्याची दांडी. त्यामुळे, ताका आणि तूर यांचे आपल्याला नेहमी माहीत असलेले अर्थ न घेता इथे विणकराच्या व्यवसायातले अर्थ लक्षात घ्यायला हवेत; कारण विणकाराच्या मागावरचा ताका किंवा तागा हा वास्तविक तुरे वर म्हणजेच लाकडाभोवती गुंडाळला जायला हवा. पण ताका आणि तूर यांचा परस्पर संबंध येऊ द्यायचा नाही म्हणजे त्यांचा संबंध टाळायचा. म्हणजेच कापड आणि ज्या लाकडाभोवती ते गुंडाळायचे ते लाकूड यांचा संबंध टाळायचा; म्हणजे जे काम खरोखर अपेक्षित असते, व्हायला हवे असते किंवा होणे रास्त असते, तेच मुद्दाम होऊ द्यायचे नाही, असा याचा अर्थ आहे.

**आता तुरीवरून आणखी काही म्हणी/वाक्प्रचार –**

**हातावर तुरी देणे –** हातावर हात देऊन उघडपणे, बघता बघता फसवून पळून जाणे. यात तुरी देणे म्हणजे पुन्हा कापड गुंडाळण्याचा रूळ असा अर्थ घेतला तर ताकास तूर मधल्या तुरीशीच संबंध येतो.

**बाजारात तुरी भट भटणीला मारी –** यात मात्र तूर या धान्याचा संबंध आहे. बाजारातून तुरीची डाळ घरी आणण्याच्या आधीच ती शिजवण्यासंबंधात नवरा बायकोत भांडण होऊन, भट बायकोला मारतो. यावरून जी गोष्ट घडून यावयाची आहे, तिच्याबद्दल अगोदर व्यर्थ वाद घालीत बसणे असा अर्थ.

**तुरीची काठी तुरीवर झाडावी –** म्हणजेच योग्य ठिकाणी योग्य तेच करावे, योग्य तेच वागावे. नको त्या ठिकाणी नको ते वागल्यास, बोलल्यास परिणाम चांगला होत नाही.

– **नेहा लिमये,** nehaalimaye@gmail.com

---

## सोडवा पाहू 'क' चे कडबोळे

**दिलेल्या अर्थाच्या मदतीने आणि 'क' या अक्षराने सुरू झालेले फक्त तीनच अक्षरी असे पुढील शब्द शोधून काढा.**

**१) सोनं :** क – – **२) उणीव :** क – – **३) लेखणी :** क – – **४) संन्याशाचं वस्त्र :** क – –

**५) पिंगटरंगी गाय :** क – – **६) कळी :** क – – **७) मिळकत :** क – – **८) कापडी भिंत :** क – –

व्यक्तिमत्त्वाला घडवू आणि स्वतःस पैलू पाडू या। बुद्धिनिष्ठ दृष्टीने इथले, भले-बुरे मग ताडू या।।



वार्षिक देणगीदार – • 'संतुल' उद्योजक, श्री. मिलिंद संत, पुणे • श्री. अजय फाटक, पुणे

## हसा हसा...

खूप वर्षांनी दोन मित्र भेटले आणि जुन्या आठवणींत रंगून गेले.

**पहिला** : मी काय बावळट होतो नाही शाळेत असताना? काही बोलताच यायचं नाही मला कोणाशी नीट आणि आता जगभर व्याख्यानं देत फिरतो.

**दुसरा** : अरे वा!

**पहिला** : आणि मी किती लठ्ठही होतो तेव्हा. पण आता बघ. छान ठेवलीय की नाही तब्येत? अरे, मी रोज व्यायाम करतोय गेली कित्येक वर्षे!

**दुसरा** : अरे वा!

**पहिला** : अरे पण तू काहीस सांगत नाहीयेस तुझ्याबद्दल! तुझ्यात काय काय बदल झालेत रे?

**दुसरा** : अरे, तुला आठवतं का की कोणी बडबड करायला लागलं, की मी किती संतापायचो? आता काही नाही. नुसतं 'अरे वा!' एवढंच म्हणतो.

---

तुरुंगाचे जेलर आठ दिवसांच्या रजेवरून परत आले. तुरुंगाचा हवालदार, चिंतातुर दिसत होता, ते पाहून जेलरने विचारले,

**जेलर** : ''का रे, एवढ्या चिंतेत का?''

**हवालदार** : साहेब, पाच दिवसांपूर्वी कैद्यांनी तुरुंगात 'रामलीला' हे नाटक सादर केलं.

**जेलर** : फारच छान, म्हणजे सत्यवादी राम त्यांना आवडू लागला. त्यांच्यात परिवर्तन होतंय. तू का चिंता करतोस?

**हवालदार** : तसं नाही साहेब. हनुमानाची भूमिका करणारा नट 'संजीवनी' आणायला म्हणून जो गेला तो अजून परत आलेलाच नाही.

## प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष २१/८)

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

**या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ जून २०२१ पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी! या निमित्ताने तुम्ही अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.**

**प्रश्नांची उत्तरे लिहा –**

१) कथेतील डॉ. स्वानंद भावे कापडात गुंडाळलेल्या सरस्वतीच्या मूर्तीपाशी कसे येऊन पोहोचतात?

२) तुम्ही घालवलेल्या अविस्मणीय सुट्टीचे अनुभव लिहून पाठवा.

३) घरोघरी वर्तमानपत्र टाकणाऱ्या कवितेमधल्या मुलाचं काय स्वप्न आहे?

४) डोळे/कान या अवयवावर आधारित किमान ५ वाक्प्रचार/म्हणी लिहा.

५) तुम्हाला आवडलेला चित्रपट/पुस्तकाचा परिचय लिहून पाठवा.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ वैशाख शके १९४३, १ मे २०२१ या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ येथे छापून,ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

यह मासिक पत्रिका ज्ञान प्रबोधिनी संस्था के स्वामित्व में है। मासिक के मुद्रक, प्रकाशक और संपादक श्री. महेन्द्र सेठिया इन्होने यह मासिक राष्ट्रीय सौर ११ वैशाख, शके १९४३ तथा १ मे २०२१ इस दिनांक पर प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ यहाँ मुद्रण कर के ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० से प्रकाशित की है।

## मनामनातून आज गर्जू दे...

मनामनातून आज गर्जू दे राष्ट्रशक्तीची ललकारी
साद घाल तू निजबाहूंना, मुक्त नभी अन् घेई भरारी ।। ध्रु. ।।

गतकाळाचे डिंडिम का हो उगाच पिटता, उरिपोटी
या शतकाचे साहस थिजले? स्फूर्तीला का ही ओहोटी?
'भाळी मिरवीन वांझ वारसा' पुरुषार्थाची का ही कसोटी?
संभ्रम का हा? बुद्धिभेद का? विद्ध मनाला तूच विचारी ।। १ ।।

कोटिकरांची उधळण येथे, भूमी सुजला सुफला ही
ज्ञान भक्तीच्या संयोगाने, प्रखर बुद्धिने शोभविली
संघटनेची चिन्गारीही मनामनातच रुजलेली
का ह्याची विस्मृती? कशास्तव आत्मशक्तीला आव्हेरी? ।। २ ।।

विचार आणिक विवेक चित्ती, जागृत व्हावी विजिगीषा
डोळ्यांना परि भुलवित आहे, मोहमयी ही अभिलाषा
सत्ता, स्पर्धा, भोग देहिचा, अनिर्बंध ही असे लालसा
धुंद मनाला कशी उमजावी आर्त हाक आहे दारी ।। ३ ।।

देशच माझा - माझी भूमी-माझे दैवत येथील व्यक्ती
हिच्याचसाठी माझा कण-क्षण, हिच्याकारणी माझी शक्ती
हीच स्पंदने जाण हृदयीची, एक मुखी हो अभिव्यक्ती
संघटनेच्या विराट हस्ते ध्येयसिद्धीचा याग करी ।। ४ ।।

**- वाचस्पती अनघा लवळेकर**

या पद्याची चाल ऐका आणि पद्य म्हणा!

**पद्याचा अर्थ :** या देशातील प्रत्येक तरुणाच्या मनात असलेल्या सुप्त शक्तीला येथे साद घातली आहे. 'तुमचे कर्तृत्व फुलवून मुक्त आकाशात भरारी घ्या. आणि सगळ्यांनी एकत्र येऊन देशाच्या विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी सज्ज व्हा,' अशी चेतावणी येथे दिली आहे.

केवळ आपल्या इतिहासकालातील उज्ज्वल घटनांचा मोठेपणा मिरवू नका. आजच्या वर्तमानकाळात तुम्ही निष्प्रभ बसून राहू नका. आत्मपरीक्षण करा. इतिहासाचे स्मरण जरूर करा; पण केवळ त्यात रमून राहू नका. या सुजलां, सुफलां भूमीचा, इथे जन्मेलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींचा, त्यांच्या पराक्रमाचा जरूर अभिमान बाळगा; पण अशा अनेक कर्तृत्ववान व्यक्तींनी एकत्र येऊन इतिहास घडवला हे विसरू नका. विचार आणि सारासार विवेक बाळगून जग जिंकण्याची इच्छा मनी बाळगा. वरवरच्या सत्ता, स्पर्धा, मोह यात गुंतू नका.

हा देश, येथील व्यक्ती ही आपल्यासाठी देव आहे. त्यांच्या उद्धारासाठी माझी सर्व शक्ती मी पणाला लावीन. आम्ही सर्व एकत्र येऊन एकदिलाने, संघटित होऊन देशाच्या विकासाचे ध्येय साध्य करू. ही देशोद्धाराच्या तळमळीची ज्योत प्रत्येक तरुण मनात जागी व्हावी, ही कवयित्रीची आंतरिक तळमळ या पद्यातील शब्दाशब्दातून व्यक्त होते आहे.

सौर वैशाख, शके १९४३/ मे २०२१ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ वैशाख, शके १९४३/१ मे २०२१
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023
Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-5-2021



हे प्रकाशचित्र 'स्वॅलोटेल फॅमिली कॉमन मॉरमॉन' जातीच्या फुलपाखराचे आहे. घरच्या बागेत कात्री जास्वंदीच्या फुलावर बसलेले हे फुलपाखरू Nikon DSLR D5100 या कॅमेऱ्याने काढले आहे!

– हृषिकेश चिटणीस, h.chitnis@gmail.com

| सौर दिनदर्शिका शके १९४३ | | |
|---|---|---|
| | मे २०२१ | वैशाख ज्येष्ठ |
| श | 1 | वै.११ |
| र. | 2 | १२ |
| सो. | 3 | १३ |
| मं. | 4 | १४ |
| बु. | 5 | १५ |
| गु. | 6 | १६ |
| शु. | 7 | १७ |
| श. | 8 | १८ |
| र. | 9 | १९ |
| सो. | 10 | २० |
| मं. | 11 | २१ |
| बु. | 12 | २२ |
| गु. | 13 | २३ |
| शु. | 14 | २४ |
| श. | 15 | २५ |
| र. | 16 | २६ |
| सो. | 17 | २७ |
| मं. | 18 | २८ |
| बु. | 19 | २९ |
| गु. | 20 | ३० |
| शु. | 21 | ३१ |
| श. | 22 | ज्ये.१ |
| र. | 23 | २ |
| सो. | 24 | ३ |
| मं | 25 | ४ |
| बु. | 26 | ५ |
| गु. | 27 | ६ |
| शु. | 28 | ७ |
| श. | 29 | ८ |
| र | 30 | ९ |
| सो. | 31 | १० |

सभासदांनी आपले व्हॉटस् ॲप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९०१११६१४४५ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी संपर्क साधता येईल.

सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या अंकाची किंमत :** ₹ २०
**वार्षिक वर्गणी :** ₹ २००

प्रिय पोस्टमन,

कोरोनाच्या संकटकाळातही जोखीम पत्करून हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे.

तुम्ही सुरक्षित राहावे ही प्रार्थना व सर्वतोपरी काळजी घ्यावी, ही आपुलकीच्या नात्याने विनंती!

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन